# NOTICE OF SALE THROUGH PRIVATE TREATY

**Name of the Bank/FI/ARC**: CFM ARC T- 5 IndusInd Bank

Address of the Branch/Office: MUMBAI

Authorised Officer's Details: Name: Mr Tejas Joshi, Assistant Vice President

Mobile : +91 89768 62751

Phone: +91 22 40055332/40055282

Email : tejas.joshi@cfmarc.in ; info@cfmarc.in

URL : http://www.cfmarc.in/

## NOTICE AND STANDARD TERMS & CONDITIONS FOR SALE OF PROPERTY THROUGH PRIVATE TREATY

The undersigned as Authorised Officer of CFM ARC T-5 IndusInd Bank has taken over physical possession of the schedule property(ies) u/s 13(4) of the SARFAESI Act.

Public at large and in particular to the Borrower (s), Mortgagor (s) and Guarantor (s) are informed that the below described Immovable/Movable property/ies charged to the CFM Asset Reconstruction P ltd and possession of which has been taken by the Authorised Officer of CFM Asset Reconstruction P ltd will be sold through Private Treaty on "As is where is", "As is what is", "Whatever there is" basis under following terms & conditions for recovery of dues in below mentioned account/s.

1. Sale through Private Treaty will be on "As is where is", "As is what is", "Whatever there is" basis and under the Securitisation and Reconstruction of Financial Assets and Enforcement of Security Interest Act, 2002 read with proviso to Rule 6 (2) & 8 (6) of the Security Interest (Enforcement) Rules, 2002 (hereinafter refereed as "Rules")

2. Prospective Purchaser is requested to submit application/offer to the Bank in attached format (Annexure-B) to purchase the property. Offer amount should be not less than the reserve price mentioned below. Prospective Purchaser should submit an application in (Annexure-B) to the Authorised Officer along with EMD @ 10% of Reserve Price with the following documents –

A. Pan Card and Aadhar Card (Mandatory)
B. Election ID/Electricity Bill/Passport/Bank Account Statement/ Any other valid and acceptable document showing the address (As address proof)
C. In case of Company, along with above, Board Resolution authorizing the officials of the company to participate in sale by Private Treaty.
D. Copy of proper authorization, in case of authorised officials.
E. Phone/Mobile Number /email ID

3. On receipt of the application offer, ARC will evaluate the same and complete other statutory procedures and communicate acceptance of offer thorough letter of sale of secured asset(s) to the prospective purchaser specifying the terms and conditions of the sale through Private Treaty.

4. The purchaser shall pay a deposit of 25% twenty five percent of the amount (including EMD amount) of the sale consideration on the same day or next working day of receipt of ARC's acceptance of offer and the remaining 75% amount on or before 15 days or such extended period

may be agreed upon in writing between the AO/Bank and purchaser, in any case not exceeding three months( 3 months).

5. Failure to remit the amount as required under clause (4) above, will cause forfeiture of amount already paid including 10% of the amount paid along with application and the Authorized Officer shall have the liberty conduct a fresh sale of the property & the defaulting bidder shall not have any claim over the forfeited amount and the property.

6. In case of non-acceptance of purchasers offer by the ARC, the amount of 10% paid along with the application will be refunded without any interest.

7. On receipt of the entire sale consideration, the Authorised Officer will issue the Sale Certificate as per Rules. The purchaser has to bear all applicable stamp duty, registration fee, statutory dues and other expenses, taxes, duties etc. No request for inclusion/substitution of names, other than those mentioned in the application, in the sale certificate will be entertained. The Sale Certificate will be issued in the name of the applicant purchaser only.

The Sale Certificate will not be issued pending operation of any stay/ injunction/restraint order passed by the DRT/DRAT/High Court or any other court against the issue of Sale Certificate. In case sale is cancelled due to any DRT/ Court order or delay in handing over physical possession or any other reasons, Bank /ARC will return the amount deposited without any interest.

8. The Bank/ARC reserves the right to reject any offer of purchaser without assigning any reason.

9. In case of more than one offer, the Bank / ARC will accept the highest offer or may conduct inter-se bidding among the interested purchasers.

10. In case of Immovable property, payment of sale consideration will be subject to TDS under Section 194-1A of Income Tax Act 1961 and TDS is to be deducted by the purchaser only at the time of deposit of remaining 75% of the bid amount. In case of Movable assets, the successful prospective purchaser shall have to pay applicable Goods & Service Tax (GST) or any the applicable tax over and above sale amount to Bank.

11. The property is being sold with all the existing and future encumbrances whether known or unknown to the Bank/ARC. The Authorised Officer / Secured Creditor Bank shall not be responsible in any way for any third-party claims / rights / dues.

12. The purchaser should conduct due diligence on all aspects related to the property (under sale through private treaty) to his satisfaction. The property is being sold on “As is where is”, “As is what is” and “Whatever there is” basis and the prospective purchaser should make their own discreet independent inquiries & verify the concerned Registrar/SRO/Revenue Records/ RTO/ other Statutory authorities regarding the encumbrances and claims/rights/dues/ charges of any authority such as Sales Tax, Excise/GST/Income Tax besides the ARC/Bank’s charge and shall satisfy themselves regarding the, title nature, description, extent, quality, quantity, condition, encumbrance, lien, charge, statutory dues, etc over the property before submitting their bids. The Authorised Officer/ Secured Creditor shall not be responsible in any way for any third-party encumbrances/ claims/rights/dues. The Bank does not undertake any responsibility to procure any permission/license, NOC, etc. in respect of the property offered for sale. The purchaser has to bear all applicable outstanding dues of water/service charges, transfer fees, electricity dues, and dues to the Municipal Corporation /local

authority/Co-operative Housing Society or any other dues, taxes, levies, fees, transfer fees if any in respect of and/or in relation to the sale of the property. The purchaser shall not be entitled to make any claim against the Authorised Officer /Secured Creditor in this regard at a later date.

13. Intending Bidders are advised to properly read the above terms & conditions of sale and follow them strictly.

14. Sale shall be in accordance with the provisions of SARFAESI Act 2002 and Security Interest (Enforcement) Rules, 2002 framed there under and the terms & conditions mentioned above.

15. The interested parties may contact the Authorised Officer for further details/Property Inspection/any clarification and for submitting their application.

SCHEDULE

| Description of secured assets | Reserve Price | EMD |
|---|---|---|
| All piece and parcel of Commercial Office admsg about 5496 sq. ft (Carpet) bearing no. 386 on the Second floor of the building known as Sane Guruji Premises Co-op Society constructed and all the fixtures, fittings thereon and the undivided interest in the land situate, being and lying at property no block no. 7, Second floor, 386. Veer Savarkar Road, Opp. Siddhi Vinayak Temple, Prabhadevi, Mumbai – 400 025 in the registration Mumbai and which is bounded as follows: -<br>• On or towards North: Plot No. 1210, Saiani Colony<br>• On or towards West: Plot No. 1210, Shree Sai Sidhi Vinayak CHSL<br>• On or towards East: SV Savarkar Marg, veer Savarkar Marg<br>• On or towards South: Plt No. 1209, Raheja Impress | INR 15,00,00,000/-<br>[Rupees Fifteen Crore Only] | INR 1,50,00,000/-<br>[Rupees One Crore Fifty Lakhs Only] |
| Name & address of Borrower/s / Guarantor/ Mortgagor(s) | Fedder Manufacturing Pvt. Ltd. (Mortgagor) (Erstwhile Lloyd Manufacturing Pvt Ltd.) Mr. Bharat Raj Punj –being legal heir of Late B.R. Punj (Guarantor) | |

4 Reserve Price (Rs.) (below which the property will not be sold): - INR 15,00,00,000/-

[Rupees Fifteen Crore Only]

5 Earnest Money Deposit (EMD): - INR 1,50,00,000/-

[Rupees One Crore Fifty Lakhs Only]

6 Earnest Money Deposit (EMD) shall be deposited through RTGS/NEFT/Fund Transfer to the credit of

| | |
|---|---|
| Account Holder | CFMARC Trust -5 IndusInd Bank |
| Account Number | 201004393833 |
| Bank | IndusInd Bank |
| Branch | Opera House Branch |
| IFSC | INDB0000001 |

7. Status of Possession: - Physical

Date: 07-08-2024

Place: MUMBAI

for CFM Asset Reconstruction P ltd

Authorised Officer sd/-

Acting as trustee of CFMARC Trust -5 IndusInd Bank

Enc; - Annexure B - Application for Purchase of Property through Private Treaty and Annexure C-Affidavit cum Undertaking u/s 29A of IBC,2016

**APPLICATION FOR SUBMISSION OF EXPRESSION OF INTEREST FOR PURCHASE OF PROPERTY THROUGH PRIVATE TREATY**

**APPLICATION FORM**

The Authorised Officer Date:

CFM ARC T-5 Indusind bank.

CFM Asset Reconstruction Pvt. Ltd.
1st Floor, Wakefield House,
Sprott Road, Ballard Estate,
Mumbai 400 038, India
Dear Sir,

Sub: Application for Purchase of Property through Private Treaty

We refer your Notice and Standard Terms & Conditions dated ______________________for

Sale of below described Property through Private Treaty.

I / We am / are interested to purchase the under-noted property through Private Treaty on "As is where is", "As is what is", "Whatever there is" basis in accordance with SARFAESI Act, 2002.

| Serial No | | |
|---|---|---|
| 1. | Property belonging to Shri/M/s: - | Fedder Manufacturing Pvt. Ltd. (Mortgagor) (Erstwhile Lloyd Manufacturing Pvt Ltd.) Mr. Bharat Raj Punj –being legal heir of Late B.R. Punj (Guarantor) |
| 2. | Description of property: - | All piece and parcel of Commercial Office admsg about 5496 sq. ft (Carpet) bearing no. 386 on the Second floor of the building known as Sane Guruji Premises Co-op Society constructed and all the fixtures, fittings thereon and the undivided interest in the land situate, being and lying at property no block no. 7, Second floor, 386. Veer Savarkar Road, Opp. Siddhi Vinayak Temple, Prabhadevi, Mumbai – 400 025 in the registration Mumbai and which is bounded as follows: -<br>• On or towards North: Plot No. 1210, Saiani Colony<br>• On or towards West: Plot No. 1210, Shree Sai Sidhi Vinayak CHSL<br>• On or towards East: SV Savarkar Marg, veer Savarkar Marg<br>• On or towards South: Plt No. 1209, Raheja Impress |
| 3. | Reserve Price property published: - | |
| 4. | Amount offered: - | |

I / We hereby deposit / have deposited Rs ……………….. (Rupees ………………………………………. only) as initial deposit (EMD) through Draft/Cheque no./ RTGS / NEFT ……….. dated………………..in favour

of CFM ARC T-5 Indusind bank.

I/We am/are have gone through the above Notice and Standard Terms & Conditions for sale through Private Treaty and conducted due diligence on all aspects related to the property to our satisfaction.

I/ We am/are hereby agreed for all terms and conditions stated in notice & standard terms and conditions for sale of above property under private treaty.

I / We also enclose copies of the required KYC documents.

We request you to kindly verify the same and communicate your approval in the matter.

Signature………………..

Name……………………

Address…………………

………………..Pincode……………

Phone No……………………

Email ID…………………………..

Enclosure:

i. Pan Card and Aadhar Card (Mandatory).

ii. Election ID/Aadhar Card Electricity Bill/Passport/Bank Account Statement/ Any other valid and

acceptable document showing address of the purchaser.

iii. Copy of proper authorization, in case of authorised officials.

iv. Board Resolution authorizing the officials of the company to purchase the property through Private Treaty (in case of Companies)

v. Affidavit cum Undertaking declaring u/s.29A of IBC, 2016 on a Rs.500/- Stamp paper-(As per Anneuxre-C)

ON A RS.500/- NON-JUDICIAL STAMP PAPER

To,

The Authorised Officer,

CFM Asset Reconstruction Pvt. Ltd (CFMARC)

1st Floor, Wakefied House, Sprott Road, Ballard Estate,

Mumbai 400 038

**Affidavit cum Undertaking**

I, ___________________________________(name of the Chairman/ MD/ Director/ Authorised person/partner of the Purchaser Company/ partnership firm/LLP, etc) s/o ___________, aged about ---------- years, currently residing at --------- and having pan No__________ and Aadhar No.----------, on behalf of ---------- (name of the Prospective Purchaser) having registered office at --------------- ( herein referred as the "Prospective Purchaser") pursuant to Authorization of the Board of Directors/ Power of Attorney) of the Prospective Purchaser dated -----------, ( as enclosed herewith), do solemnly affirm and state as under:

a. That I am duly authorised and competent to make and affirm this affidavit for and on behalf of the Prospective Purchaser in terms of resolution of board of directors/ Power of Attorney DTD -----, I hereby unconditionally state, submit and confirm that the document is true, valid and genuine.

b. I hereby unconditionally state, submit and confirm that the Prospective Purchaser is not disqualified from submitting the offer letter and /or tender to purchase the property being ---------------------( hereinafter referred as “the secured asset”) by way of Private treaty or by way of any other mode of sale as laid down under SARFAEI Act, 2002 read with the rules thereunder and or the modes of sale available with CFM Asset Reconstruction Private Limited (CFMARC) by virtue of being secured creditor to enforce security interest over the secured asset under SARFAESI Act, 2002.

c. That neither the (I) Prospective Purchaser nor(ii) any person acting jointly or in concert with the Prospective purchaser not (iii) any person who is a connected person with the Borrower or Borrower company namely __________________________________________

d. That neither the (I) Prospective Purchaser nor (ii) any person acting jointly or in concert with the Prospective Purchaser nor (iii) any person who is a connected person; (a) the Prospective Purchaser or (b) any person acting jointly or in concert with the Prospective Purchaser:

i) is an undischarged insolvent,

ii) is a willful defaulter in accordance with the guidelines of the Reserve Bank of India issued under the Banking Regulation Act, 1949;

iii) is at the time of submission of the sale offer, a person who (a)has an account which has been classified as non performing asset in accordance with the guidelines of the Reserve Bank of India under the Banking Regulation Act, 1949 or the guidelines of the financial sector regulator issued under any other law for the time being in force, or (b) controls or manages or is the promoter of a the borrower Company or the Guarantor Company whose account has been, classified as non-performing asset in accordance with the guidelines of the Reserve Bank of India issued under the Banking Regulation Act,1949 or the guidelines of a financial sector regulator issued under any other law for the time being in force; and such classification has continued for a period of one year or more from the date of such

classification till the date of commencement of the Corporate Insolvency resolution process of the Corporate Debtor and all such overdue amounts along with interest, cost and charges thereon has not been fully repaid at the time of submission of this Sale offer;

iv) has been convicted of any offence punishable with two years or more or with imprisonment and two years have not passed from the date of release from such imprisonment: or

v) has been a Promoter or in the management or control of a Borrower Company in which a preferential transaction has taken place and in respect of which an order has been made by the Honourable National Company Law Tribunal ( or its appellate tribunals or Courts). (other than a preferential transaction, undervalued transaction, extortionate credit transaction or fraudulent transaction by the Prospective purchaser pursuant to a resolution plan approved under the code or pursuant to the scheme or plan approved by a financial sector regulator or court, and the Prospective purchaser has not otherwise contributed to the preferential transaction, undervalued transaction, extortionate credit transaction or fraudulent transaction) which has taken place prior to the acquisition of the financial assets of the Borrower Company by the Secured Creditor;

vi)has executed a guarantee in favour of a creditor , in respect of a Borrower against which an application for Insolvency resolution made by such creditor has been admitted under the code, where such guarantee has been invoked by the creditor and remains unpaid in full or part;

vii) is subject to any other aforesaid conditions under any law in a jurisdiction outside India.

e. That the Prospective Purchaser unconditionally and irrevocably represents, warrants, and confirms that it is eligible to participate in the sale process as laid down under SARFAESI Act, 2002 read with the Security Enforcement Rule, 2002 and that it shall provide all the documents, representations and information as may be required by the CFMARC/Secured Creditor or any other authority as may be applicable.

f. That the Prospective Purchaser unconditionally and irrevocably undertakes that it shall provide all data, documents and information as may be required to verify the statement made under this affidavit cum Undertaking.

g. That the Prospective Purchaser understands that CFMARC may rely on the confirmations, representations and warrants provided by the Prospective purchaser under this affidavit cum undertaking.

h. That in the event of any of any of the above statements are found to be untrue or incorrect then the Prospective purchaser unconditionally agrees to indemnity and hold harmless the CFMARC and /or the Secured Creditor.

i. That the Prospective Purchasers agrees and undertakes to disclose/ inform forthwith, to the CFMARC/Secured Creditor if the Prospective purchaser becomes aware of any change in factual information in relation to at any stage of the sale process.

j. That this affidavit cum undertaking shall be governed in accordance with the laws of India and the adjudicating authority shall have the exclusive jurisdiction over any dispute arising under this affidavit.

Solemnly affirmed at ----------------------- on this----------- --------- day of -------, 2024.

Deponent

श्रावण शु. तृतीया
विक्रम संवत : २०८०

वर्ष : ११ अंक : ९७ पृष्ठ : ८ मूल्य : ३.०० रुपये
मुंबई, बुधवार दि. ०७ ऑगस्ट २०२४






मराठी दैनिक
# प्रात:काल




प्रात:काल समूह | मराठी-हिंदी | मुंबई आवृत्ती ❖ मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, कोल्हापूर, नाशिक, पुणे येथून वितरीत ❖ आरएनआय क्रमांक - MAHMAR/2014/57260 ❖ www.pratahkal.com

# उद्धव ठाकरे भेटीगाठींसाठी दिल्ली दौऱ्यावर!

**नवी दिल्ली , दि. ०६ (वृत्तसंस्था) :** महाराष्ट्राचे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिलेल्या निर्णयाला आव्हान देत उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्त्वातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार या दोन पक्षांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्यासमोर दोन्ही पक्षांच्या याचिकांवर स्वतंत्रपणे सुनावणी घेण्यात येणार आहे. याच दरम्यान विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांच्या भेटीगाठींसाठी उद्धव ठाकरे देखील दिल्लीत पोहचले आहेत.



महाराष्ट्रातील सत्ता संघर्षात महत्त्वाचं ठरलेल्या आमदार अपात्रता प्रकरणाचा निर्णय सर्वोच्च न्यायालयानं विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यावर सोपवला होता. आमदार अपात्रता प्रकरणासाठी सर्वोच्च न्यायालयानं काही निकष देखील घालून दिले होते. राहुल नार्वेकर यांनी त्यांचा निकाल देताना शिवसेनेच्या दोन्ही गटाच्या आमदारांना पात्र ठरवलं होतं. तर, जुलै २०२३ मध्ये शिवसेनेप्रमाणे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडली. यावेळी देखील राहुल नार्वेकर यांच्याकडे आमदार अपात्रता प्रकरणी याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. राहुल नार्वेकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटाच्या आमदारांना पात्र ठरवलं होतं. या निर्णयाविरुद्ध ठाकरे गट आणि शरद पवार यांच्या नेतृत्त्वातील पक्षानं सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली.

दरम्यान, ठाकरे तीन दिवसांच्या दिल्ली दौऱ्यात इंडिया आघाडीतील महत्त्वाच्या नेत्यांच्या भेटी घेणार आहेत. यामध्ये सोनिया गांधी, मलिकार्जुन खरगे, आप आणि टीएमसीच्या नेत्यांच्या भेटी उद्धव ठाकरे घेणार आहेत. महाराष्ट्र काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांची देखील भेट उद्धव ठाकरे घेतील. तीन दिवसांमध्ये मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या निवासस्थानी सुद्धा उद्धव ठाकरे भेटीसाठी जाणार असल्याची माहिती आहे.

उद्धव ठाकरे यांच्यासोबत आदित्य ठाकरे आणि रश्मी ठाकरे सुद्धा दिल्ली दौऱ्यात आहेत.

## "जे आम्हाला दिल्लीची पायपुसनी म्हणायचे, ते आता दिल्लीत कशासाठी लोटांगण घालतात"

जे आम्हाला दिल्लीची पायपुसनी म्हणत होते, ते आता दिल्लीत कशासाठी लोटांगण घालायला जात आहेत, असे म्हणत शिवसेना ठाकरे पक्षाचे नेते आणि आमदार संजय शिरसाट यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंवर जोरदार निशाणा साधला. तसेच, संजय राऊत हे तर वाढपीच्या भूमिकेत आहेत. कोणाला लोणचं द्या, कोणाला पाणी भरून दे... जे एकेकाळी दिल्लीचे नेते महाराष्ट्रात जागा वाटपासाठी येत होते, आता ती परिस्थिती राहिलेली नाही, असे म्हणत संजय राऊत यांच्यावरही निशाणा साधला.


आमदार संजय शिरसाटांचा टोला

आगामी विधानसभा निवडणुकांचे वेध सर्वच राजकीय पक्षांना लागले असून त्याच पार्श्वभूमीवर बैठका आणि संवाद यात्रांचेही आयोजन केले जात आहेत. राज्यात महाविकास आघाडी विरुद्ध महायुती असा सामना रंगणार आहे. त्यामुळे, महाविकास आघाडीतील जागावाटपासाठी तिन्ही पक्ष एकत्र येऊन चर्चा करत आहेत. त्याच पार्श्वभूमीपर शिवसेना उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आजपासून तीन दिवसांच्या दिल्ली दौऱ्यावर आहेत. त्यावरुन, शिवसेना शिंदे गटाकडून उद्धव ठाकरेंना लक्ष्य केलं जात आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या दिल्ली दौऱ्यावरुन ठाकरे गटाकडून सातत्याने टीका केली जाते. आता, ठाकरेंच्या दिल्ली दौऱ्यावर शिंदे गटाकडून प्रतिहल्ला केला जात आहे.

## मुख्यमंत्रीपदासाठी उद्धव ठाकरेंची काँग्रेसपुढे लाचारी

हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे हयात असताना राष्ट्रीय नेते चर्चेसाठी मातोश्रीची पायरी चढायचे हे देशाने पाहिले आहे. मात्र उद्धव ठाकरे सत्तेच्या लालसेपोटी लाचारी पत्करुन दिल्लीतल्या काँग्रेस हायकमांडपुढे लोटांगण घालत आहेत, अशी घणाघाती टीका शिवसेना उपनेते व प्रवक्ते संजय निरुपम यांनी आज केली. बाळासाहेब भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. सध्या उद्धव ठाकरे यांचा दिल्ली दौरा हा लाचारीचे एक उदाहरण आहे, असे निरुपम म्हणाले.


शिवसेना उपनेते व प्रवक्ते संजय निरुपम यांची घणाघाती टीका

पुणे, नाशिकमध्ये पूरस्थिती असून त्यावर राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पूरग्रस्तांसाठी मदतकार्य आणि उपाययोजना करत आहेत. त्यासाठी त्यांनी दिल्ली दौरा रद्द केला. मात्र दुसऱ्या बाजूला मुख्यमंत्रीपदाच्या लालसेपोटी उद्धव ठाकरे दिल्लीत काँग्रेस हायकमांडच्या दारात खेटे झिजवत आहेत, अशी खरमरीत टीका निरुपम यांनी केली.

ते पुढे म्हणाले की, महाविकास आघाडीमध्ये मुख्यमंत्रीपदासाठी डझनभर नेत्यांमध्ये रस्सीखेच सुरु आहे. त्यांचे सरकार येणार नाहीच पण तरीही मविआतला प्रत्येक नेता मुख्यमंत्री बनण्यासाठी गुडघ्याला बाशिंग बांधून तयार आहेत, असा टोला निरुपम यांनी लगावला. नाना पटोले, बाळासाहेब थोरात, जितेंद्र आव्हाड, अनिल देशमुख यांच्यासह आदित्य ठाकरे देखील मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत आहेत. मात्र उबाठाने यावर कुरघोडी करुन दिल्ली गाठली

# शेख हसीना सोडणार भारत!

**नवी दिल्ली , दि. ०६ (वृत्तसंस्था) :** बांगलादेशमधील हिंसाचारानंतर आपला देश सोडून भारतात आलेल्या माजी पंतप्रधान शेख हसीना पुढील ४८ तासांत युरोपला जाऊ शकतात. दरम्यान, युरोपातील कोणत्या देशात जाणार याबाबतची माहिती समोर आलेली नाही. याआधी त्या लंडनमध्ये जाणार असे बोलले जात होते. मात्र ब्रिटनने त्यांना देशात येण्याची परवानगी दिली नाही. तसेच अमेरिकेनेही त्यांचा व्हिसा रद्द केला आहे. यामुळे आता त्या फिनलँड आणि रशिया यांसारख्या देशांशी चर्चा करत आहेत.

दरम्यान, त्या सध्या उत्तर प्रदेशातील गाझियाबाद स्थित हिंडन एअरबेसच्या एका सेफ हाऊसमध्ये आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार शेख हसीना युरोपातील कोणत्याही देशात जाऊ शकतात. सोबतच इतर देशांशीही चर्चा सुरू आहेत. चर्चा अशीही होत आहे की त्या रशियालाही शरण जाऊ शकतात. यासोबतच हे ही म्हटले जात आहे की शेख हसीना यांना भारत पूर्णपणे सुरक्षा देईल आणि त्यांच्या जाण्याची व्यवस्थाही करेल. यामागचे कारण आहे की जे विमान शेख हसीना यांना भारतात सोडण्यास आले होते ते बांगलादेशच्या वायुसेनेचे होते आणि ते परतले आहे. अशातच आता त्या ज्या देशात जातील त्यांच्या जाण्याची व्यवस्था भारत करेल. दरम्यान, शेख हसीना यांच्या सुरक्षित बाहेर पडण्याची सर्व व्यवस्था करण्यात आली आहे. सोमवारी संध्याकाळी भारतात पोहोचलेल्या हसीना फिनलँड आणि रशिया यांसारख्या देशांशी चर्चा करत आहेत.भारत त्यांच्या पुढील परदेशी प्रवासासाठी त्यांच्या सुरक्षेचीही व्यवस्था करणार आहे.

- अमेरिकेने रद्द केला व्हिसा तर ब्रिटनचाही सहकार्यास नकार
- फिनलँड की रशिया? शेख हसीना कुठे जाणार?

## शेख हसिना यांना अमेरिकेचे दरवाजे बंद

बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्या अमेरिका प्रवेशावर बंदी घालण्यात आली आहे. अमेरिकन सरकारने त्यांचा व्हिसा रद्द केला आहे. परराष्ट्र खात्याच्या जवळच्या सूत्रांनी याला दुजोरा दिला आहे. हसीना यांचा मुलगा सजीब वाजेद जॉय अमेरिकेत व्हर्जिनियामध्ये राहतो. त्यामुळे त्या तिथे जातील असा अंदाज वर्तवण्यात आला होता. पण या राजकीय घडामोडीत हसीना यांना अमेरिकेने व्हिसा रद्द केला आहे. बांगलादेशच्या स्थानिक वृत्तसंस्थेनुसार, ढाका येथील अमेरिकन दूतावासाच्या अधिकाऱ्याने या मुद्द्यावर सांगितले की, अमेरिकेच्या कायद्यानुसार व्हिसाचे रेकॉर्ड गोपनीय आहेत. म्हणून आम्ही वैयक्तिक व्हिसा प्रकरणांच्या तपशीलावर चर्चा करत नाही. मात्र शेख हसीना यांच्या पक्षातील अनेक सदस्य आणि अधिकाऱ्यांवर व्हिसा बंदी घालण्यात आली आहे.





## ब्रिटनचाही सहकार्यास नकार

शेख हसीना यांनी भारतमार्गे लंडनला जाण्याची योजना आखली होती. हिंडनला पोहोचण्यापूर्वी त्यांच्या सहकाऱ्यांनी याबाबत भारतीय अधिकाऱ्यांना माहिती दिली होती. त्या बांगलादेश लष्कराच्या सी-१३०जे या विमानातून हिंडन एअरबेसवर उतरल्या. आपली बहीण शेख रेहाना हिच्याकडे तात्पुरता आश्रय घेण्यासाठी भारतातून लंडनला जाण्याचा विचार त्या करत होत्या. पण आता ब्रिटनमध्ये मोठ्या प्रमाणावर झालेल्या हिंसक निदर्शनांच्या संभाव्य तपासाविरुद्ध शेख हसीना यांना कायदेशीर संरक्षण मिळणार नाही, असे संकेत ब्रिटन सरकारने दिले आहेत.

## बांगलादेशात अडकलेल्या महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून उपाययोजना

### विद्यार्थ्यांची सुरक्षितता आणि त्यांच्या परतीसाठी परराष्ट्र मंत्रालयाशी चर्चा

**मुंबई, दि. ०६ (प्रतिनिधी) :** बांगलादेशातील नागरी अशांततेच्या पार्श्वभूमीवर तेथे अडकलेल्या राज्यातील विद्यार्थ्यांची सुरक्षितता आणि मायदेशात त्यांच्या परतीसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महत्त्वाची पावले उचलली आहेत. या विद्यार्थ्यांना तातडीची मदत उपलब्ध होणे आणि त्यांच्या भारतात परतण्यासंदर्भातील आवश्यक कार्यवाहीसाठी मुख्यमंत्री शिंदे यांनी परराष्ट्र मंत्रालयाशी संपर्क साधला आहे.



बांगलादेशातील अशांततेमुळे परदेशी नागरिकांच्या, विशेषतः अशांत भागात अडकलेल्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न निर्माण झाला आहे. मुख्यमंत्री शिंदे यांनी परराष्ट्र मंत्रालयाशी संवाद साधला असून बांगलादेशातील परिस्थितीचे गांभीर्य पाहता त्वरित कृतीची गरज अधोरेखित केली आहे. त्यांची तात्काळ सुरक्षितता सुनिश्चित करणे, आवश्यकता असल्यास बांगलादेशातील सुरक्षित ठिकाणी त्यांचे स्थलांतर करणे, भारतात त्यांच्या सुरक्षित परतीची प्रक्रिया जलद करणे या अनुषंगाने मुख्यमंत्री शिंदे यांनी चर्चा केली आहे. बांगलादेशात अडकलेल्या विद्यार्थ्यांची माहिती मिळविणे आणि त्यांना तातडीने मदत उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने सध्या बांगलादेशात असलेल्या राज्यातील विद्यार्थ्यांची यादी संकलित करून परराष्ट्र मंत्रालयाला उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांना त्वरित संपर्क साधण्यास आणि मदत उपलब्ध करणे शक्य होणार आहे.

## बांगलादेशात सुमारे ५०० कैदी तुरुंगातून पसार!



बांगलादेशात आरक्षणाच्या मुद्द्यावरुन आंदोलक प्रचंड हिंसक झाले असून त्यांनी राजीनामा देऊन देश सोडून गेलेल्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांचे शासकीय निवासस्थान लुटले. एवढंच नव्हे तर हल्लेखोर लाठ्या घेऊन थेट तुरुंगातही घुसले आणि त्यांनी कैद्यांना बाहेर काढले. यामुळे सुमारे ५०० कैदी तुरुंगातून पसार झाले आहेत. यात दहशतवाद्यांचाही समावेश असल्याची माहिती आहे. आरक्षणासाठी गेल्या अनेक दिवसांपासून बांगलादेशात सुरु असलेल्या आंदोलनाला रविवारी हिंसक वळण लागलं. त्यानंतर तब्बल १५ वर्षांपासून बांगलादेशची धुरा सांभाळणाऱ्या शेख हसीना यांनी पंतप्रधान पदाचा राजीनामा देत देश सोडून पलायन केलं आणि सत्ता लष्कराच्या हाती गेली. मात्र, आंदोलकांनी देशाची सूत्र लष्कराकडे देण्यास विरोध दर्शवला आहे. हिंसक जमावाने तुरुंगात देखील घुसून जाळपोळ केली.

# पुण्यात झिकाचे थैमान!

### रुग्णांचा आकडा ६६ वर; २६ गर्भवती महिलांचा समावेश




**पुणे, दि. ०६ (वार्ताहर) :** गेल्या काही दिवसांपासून पुण्यात झिका व्हायरसचे थैमान अधिक वाढताना दिसून येत आहे. पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून शहरात सतर्कता घेतली असूनही झिकाचे रुग्ण दिवसेंदिवस वाढत आहेत. आतापर्यंत पुण्यात झिकाचे ६६ रुग्ण आढळले असून यामध्ये २६ गर्भवती महिलांचा समावेश आहे. त्यामुळे पुणेकरांसह आरोग्य विभागाची डोकेदुखी वाढली आहे.

गेल्या काही दिवसांमध्ये झालेला मुसळधार पाऊस आणि साचलेल्या पाण्यामुळे मोठ्या प्रमाणावर धोका वाढल्याचे दिसून येत आहे. आतापर्यंत झिकाचा संसर्ग झालेल्या चार रुग्णांचा मृत्यू झाला आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाची समिती या चार रुग्णांच्या मृत्यूंचे परीक्षण करणार आहे. तसेच बावधान येथील १९ वर्षीय गर्भवतीमध्ये झिका विषाणूचा संसर्ग आढळून आला आहे. त्याचबरोबर मागील तीन दिवसांत पुणे शहरात झिका विषाणूचा प्रादुर्भाव झालेली आठ प्रकरणे नोंदवली गेली आहेत. यामध्ये सहा गर्भवती महिलांचा समावेश आहे. गर्भवती महिलांना झिकाचा अधिक धोका असल्यामुळे महिलांनी अधिक खबरदारी घ्यावी, असे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.

# आश्रमशाळेतील ७६ विद्यार्थीनींना जेवणातून विषबाधा!

**पालघर, दि. ०६ (वार्ताहर):** गेल्या काही दिवसांपासून अंगणवाडीसह विविध शाळांमधील विद्यार्थ्यांना दिलेल्या आहारामध्ये किडे, मुंग्या, आळ्या आढळल्याच्या घटना समोर आल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला. अशातच आता पालघरमधील एका आश्रम शाळेतील विद्यार्थिनींना जेवणातून विषबाधा झाल्याची धक्कादायक घटना समोर आली. डहाणू आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत येणाऱ्या रणकोळ आश्रम शाळेतील वसतिगृहात राहणाऱ्या ७६ विद्यार्थ्यांना



जेवणामधून विषबाधा झाली. सध्या त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहे. मात्र या प्रकरणामुळे एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नेहमीप्रमाणे काल रात्री या आश्रमशाळेतील विद्यार्थिनींना नेहमीप्रमाणे जेवण देण्यात आले. त्यानंतर सर्व विद्यार्थी आश्रमशाळेतील रुमवर गेले. मात्र, आज सकाळी काही विद्यार्थ्यांना मळमळ होऊ लागली. तर अनेक विद्यार्थिनींना उलट्या होऊ लागल्या. सुरुवातीला २८ विद्यार्थ्यांना त्रास सुरू झाल्याने उपचारासाठी त्यांना रात्री अडीच वाजता कासा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. त्यानंतरही बाकीच्या विद्यार्थ्यांनाही मळमळ उलटी जुलाब असा त्रास सुरू झाल्याने वानगाव ग्रामीण रुग्णालयात १६ विद्यार्थ्यांना तर ऐने येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात ३० विद्यार्थ्यांना उपचारासाठी दाखल केले. विद्यार्थ्यांच्या उपचारादरम्यान यांना अन्नातून विषबाधा झाल्याचे निष्पन्न झाले. सध्या सर्व विद्यार्थ्यांवर उपचार सुरु असून अनेकांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळत आहे.

## ११ मंदिरांमध्ये चोरी करणारा चोरटा सीसीटीव्हीमुळे सापडला

**पुणे, दि. ०६ (वार्ताहर) :** पुणे जिल्ह्यातील आंबेगाव, शिरुर, रांजणगाव, खेड परिसरातील मंदिरात चोरी करणाऱ्या चोरट्याला ग्रामीण पोलिसांच्या गुन्हे शाखेने अटक केली. चोरट्याने ग्रामीण भागातील ११ मंदिरात चोरी केल्याचे उघड झाले असून, त्याच्याकडून चार लाखांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. विनायक दामू जिते (रा. कान्हूर मेसाई ता. शिरुर) असे अटक करण्यात आलेल्या चोरट्याचे नाव आहे. आंबेगाव, शिरूर, शिक्रापुर, रांजणगाव, खेड भागातील मंदिरातून रोकड चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली होती. पोलिसांनी मंदिरातील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले होते. सराईत चोरटा जितेने चोरी केल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक भाऊसाहेब लोकरे, अमोल वडेकर, संजय साळवे, मंगेश अभंग यांना तपासात मिळाली. तो शिक्रापूर परिसरात येणार असल्याची महिती मिळाली. त्यानंतर सापळा लावून त्याला पकडले, अशी माहिती पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी पत्रकार परिषदेत दिली. अतिरिक्त पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय अधिकारी अमोल मांडवे यावेळी उपस्थित होते.

जितेने ग्रामीण भागातील वेगवेगळ्या मंदिरात चोरी केल्याचे तपासात उघड झाल आहे. जिते सराइत चोरटा आहे. मंदिरात रात्रीच्या वेळी भाविकांची वर्दळ कमी असते. हीच संधी साधून जितेने मध्यरात्री गुन्हे केले.

# फरार पूजा खेडकरचा शोध घेण्यास पोलिसांना अपयश; परदेशात गेली असल्याची चर्चा

**पुणे, दि. ०६ (वार्ताहर) :** यूपीएससीने आयएएस पद काढून घेतल्यानंतर आता दुसरीकडे न्यायालयानेही पूजा खेडकरला दणका दिला आहे. पूजा खेडकर गेल्या काही दिवसांपासून फरार आहे. न्यायालयाने अटकपूर्व जामीन नाकारल्यानंतर पूजा खेडकर दुबईला पळून गेल्याची चर्चा आहे. पूजा खेडकरचा न्यायालयाने अटकपूर्व जामीन नाकारल्यानंतर ती भारतातून थेट परदेशात पसार झाली असावी, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. पूजा खेडकरवर अनेक आरोप करण्यात आले आहेत. फरार पूजा खेडकरचा शोध घेण्यात पोलिसांना येत असलेल्या अपयशाबाबतही जनसामान्यांमध्ये उलटसुलट चर्चा सुरु झाली आहे.

पूजा खेडकरने पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवस यांच्यावर छेडछाडीचा आरोप केला होता. पूजा खेडकरने दिवसे यांच्या विरोधात वाशिम पोलिसात तक्रार दाखल केली. दिवसे यांनी लैंगिक आणि मानसिक छळ केल्याचे पूजा खेडकरनी आरोप केले होते. वाशिम पोलिसांनी महिला पोलीस अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पूजा खेडकरची तक्रार नोंदवून घेतली. मात्र दिवसे यांच्याविरोधातील तक्रार वाशिम पोलिसांच्या कार्यक्षेत येत नसल्याने ही तक्रार पुणे पोलिसांकडे वर्ग करण्यात आली होती. त्यानंतर पुणे पोलिसांनी पूजा खेडकरला या तक्रारीसंदर्भात चौकशीसाठी तब्बल तीन वेळा समन्स पाठवून देखील ती गैरहजर राहिली होती. त्यावेळी खेडकरने पोलिसांकडे काही अवधी मागितला होता. यानंतर आठवडाभरानंतरही पूजा खेडकर पोलिसांसमोर हजर झाली नाही. त्यामुळे जबाब नोंदविण्यास उपस्थित रहावे, असे समन्स पोलिसांनी तिला पुन्हा बजावले होते. तीनदा समन्स बजावूनही ती हजर झाली नाही.

## जिल्हाधिकारी दिवसे अब्रुनुकसानीचा दावा ठोकणार?

राज्यासह देशभरात गेल्या काही दिवसांमध्ये चर्चेचा विषय ठरलेल्या पूजा खेडकरवर पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवसे अब्रुनुकसानीचा दावा दाखल करणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. पूजा खेडकरनी जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी लैंगिक छळ केल्याचा आरोप केला होता. तशी तक्रार पुजा खेडकरनी पोलिसांना दिली आहे आणि यूपीएससीकडे देखील तशी तक्रार केली होती. पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात प्रशिक्षण कालावधीत सुहास दिवसेंनी लैंगिक छळ केल्याचा पुजा खेडकरचा आरोप आहे.



## पूजा खेडकरचा शोध सुरू

यूपीएससीने उच्च न्यायालयात सांगितले की, पूजा खेडकर यांनी केवळ त्यांचे नावच नाही तर तिच्या पालकांचे नाव देखील बदलले आहे. याशिवाय, फोटो-स्वाक्षरी, ईमेल आयडी, मोबाईल क्रमांक आणि पत्ता बदलून बनावट ओळख निर्माण केली. पूजा खेडकर हिने तब्बल सातवेळा आपले नाव बदलल्याचे यूपीएससीने न्यायालयात सांगितले. तसेच, तिने नियमांनुसार परवानगी असलेल्या मर्यादेपेक्षा जास्तवेळा परीक्षा देत प्रयत्न करून फसवणूक केल्याचा आरोपही तिच्यावर आहे. दिल्ली पोलीस सध्या या संपूर्ण प्रकरणाचा तपास करत आहेत. तसेच, ते पूजा खेडकरचा शोधही घेत आहेत.

## पूजा खेडकरची 'यूपीएससी' विरोधात दिल्ली हायकोर्टात याचिका




वादग्रस्त आयएएस प्रशिक्षणार्थी पूजा खेडकर हिचे आयएएस पद यूपीएससीने रद्द केल्यानंतर यूपीएससीने आयएएस उमेदवारी रद्द केल्याच्या विरोधात पूजा खेडकर हिने दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या याचिकेत पूजा खेडकरने यूपीएससी, केंद्र सरकारचे कार्मिक आणि प्रशिक्षण विभाग, मुसरी येथील लालबहादूर शास्त्री प्रशासकीय अकादमी, पुणे जिल्हाधिकारी आणि महाराष्ट्राचे मुख्य सचिव यांना प्रतिवादी केले आहे.

पूजा खेडकर हिला उच्च न्यायालयाने मोठा धक्का दिला होता. उच्च न्यायालयाने त्यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळून लावला.

सतत खोटे बोलून आणि प्रमाणपत्रांमध्ये फसवणूक करुन तिने यूपीएससीची परीक्षा दिल्याचा आरोप तिच्यावर आहे. याप्रकरणात तिच्याविरोधात पुरावेही आढळून आल्याने आता दिल्ली पोलीस अटक करण्यासाठी तिचा शोध घेत आहेत. पण, ती अद्याप फरार आहे.पूजा खेडकरने यूपीएससीच्या नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी दोषी आढळली आहे.

त्यानंतर यूपीएससीने तिची निवड रद्द केली आहे. इतकंच नाही तर भविष्यात त्यांना कोणत्याही यूपीएससी परीक्षेला बसण्यासही बंदी घालण्यात आली आहे. पूजा खेडकरच नाही तर त्यांच्या आई मनोरमा खेडकर यांच्यावरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


# संपादकीय

## 'रणनीती' आणि 'राजकारण'

बांगलादेशमध्ये आरक्षणाच्या मुद्द्यावरून अराजकता माजली असून हिंसाचार वाढला आहे. अशातच सोमवार, ५ ऑगस्ट रोजी सकाळी शेख हसीना यांनी बांगलादेशच्या पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला. एवढेच नव्हे तर त्यांनी थेट बांगलादेशमधून पलायन केले. सध्या त्या भारतात दाखल झाल्या आहेत. दूसरीकडे, आंदोलकांनी थेट शेख हसीना यांच्या कार्यालयावर हल्ला केला असून या परिसरात जाळपोळही केली. बांगलादेशामध्ये उसळलेल्या हिंसाचार आणि विद्यार्थ्यांच्या निदर्शनांमुळे बांगलादेशातील राजकारणात मोठा भूकंप आला. बांगलादेशातील सत्तापालटमागे एक ३२ वर्षीय तरुण कारणीभूत आहे. विद्यार्थी नाहिद इस्लाम हा त्या चळवळीचा मोठा चेहरा असून याने पंतप्रधानांना पायउतार होण्यास भाग पाडले. नाहिद हा मानवाधिकार कार्यकर्ता असून 'स्टुडंट्स अगेन्स्ट डिस्क्रिमिनेशन'चा को-ऑर्डिनेटरही आहे. नाहिदने पोलिसांना २० जुलैला सकाळी ताब्यात घेतल्याचा आरोप केला होता. सोशल मीडियावर एक व्हिडीओ व्हायरल होतोय. ज्यामध्ये नाहिद इस्लामला पोलीस त्यांच्या गाडीत बसवून घेऊ जाताना दिसत आहे. तो २४ तास बेपत्ता होता. मात्र नंतर तो एका पुलाखाली बेशुद्धावस्थेत सापडला. त्याच्या डोळ्यावर पट्टी बांधून एका खोलीत नेण्यात आले. तिथे त्याला बेशुद्ध होईपर्यंत त्याला मारहाण करण्यात आली, असा दावा त्याने केलाय. यापूर्वी पोलिसांनी नाहिदचे साथीदार आसिफ मेहमूद आणि अबू बकर यांनाही ताब्यात घेऊन बेदम मारहाण केली. ६ दिवसांनंतर त्याला डोळ्यावर पट्टी बांधून एका दुर्गम भागात सोडण्यात आले. मात्र, पोलिसांनी या आरोपांचं खंडन केलंय. तर त्यांना सुरक्षेमुळे ताब्यात घेण्यात आल्याचा दावा पोलिसांनी केला. तर नाहिद इस्लाम यांनी रविवारी भाषणात अवामी लीगच्या कार्यकर्त्यांना आणि नेत्यांना दहशतवादी म्हटलं होतं. त्यांना रस्त्यावर तैनात केल्याचा दावा त्याने केला. यानंतर गेले महिनाभर बांगलादेशामध्ये सुरू असलेल्या हिंसाचाराने सोमवारी आपले उद्दिष्ट साध्य केले. पंतप्रधान शेख हसीना वाजेद यांना राजीनामा देऊन देश सोडून भारतात आश्रयाला यावे लागले. ९० आंदोलकांचा प्राण गमावल्यानंतर हजारो लोक पंतप्रधान निवासात घुसले. तर लष्कराने उठाव करून येथे सर्वपक्षीयांची बैठक घेऊन काळजीवाहू अंतरिम सत्ता स्थापन केल्याची घोषणा केली. देशातील भ्रष्टाचार, बेरोजगारी आणि हुकूमशाही पद्धतीने लोकशाही चालवणाऱ्या १५ वर्षांच्या सत्तेचा बिमोड झाला.

बांगलादेशातील नोकऱ्यांमधील ३० टक्के आरक्षण हे १९७१ च्या बांगलादेश स्वातंत्र्य युद्धात लढलेल्यांच्या कुटुंबीयांना दिले जाते. हे आरक्षण सरकारी तसेच खासगी नोकऱ्यांमध्ये सुद्धा उपलब्ध आहे आणि सध्या हाच मोठा वादाचा मुद्दा ठरला आहे. देशभरातील विद्यापीठांमध्ये विद्यार्थी आंदोलन करत असताना स्थानिक पोलीस आणि सत्ताधारी आवामी लीगच्या युवा आघाडीच्या कार्यकर्त्यांबरोबर झटापटी होत होत्या. त्यातून हे आंदोलन वाढत जाऊन त्याला सर्व स्तरातून लोकांचा पाठिंबा मिळू लागला. पंधरा वर्षे सत्तेवर असणाऱ्या अवामी लीगच्या नेत्या शेख हसीना यांना देश सोडून पळून जाण्याची वेळ आली. तसे पाहायला गेले तर शेख यांची कारकीर्द म्हणजे बऱ्याच बाबतीत सुवर्णकाळ ठरावा अशीच आहे. पण जनतेची एकदा राज्यकर्त्यावरील मर्जी हटली आणि तोच तो चेहरा नकोसा झाला की सत्तेच्या विरोधातील वातावरण निर्माण होते. मग गर्दी कोणाचेही ऐकून घ्यायला तयार होत नाही. आकडेवारी काही सांगत असली तरी आणि विकासाचे कितीही दावे केले जात असले तरी सुद्धा सर्वसामान्यांच्या घराची चूल पेटणार नसेल तर तो स्वतःच्या हक्कासाठी पेटून उठणार, हे तर स्पष्ट आहे. हाच प्रकार बांगलादेशमध्ये सध्या दिसून येत आहे. अर्थात त्याला लष्कराची फूस असण्याची शक्यता अधिक आहे. ज्या देशांचा लष्करी ढवळाढवळीचा इतिहास आहे त्यामध्ये बांगलादेशाचा समावेश अग्रक्रमाने होतो. तेथे लष्कराने ही परिस्थिती निर्माण होण्यासाठी प्रयत्न केले नसतील असे म्हणणे धाडसाचे ठरेल. १७ कोटी लोकसंख्या असलेल्या बांगलादेशात एक कोटी ८० लाख युवक नोकरीची मागणी करत होते. नोकऱ्यांमध्ये असलेल्या आरक्षणाच्या निमित्ताने सत्ताधारी अवामी लीगच्या लोकांनाच ३० टक्के आरक्षणाचा फायदा देऊन नोकऱ्या दिल्या जातात असा त्यांचा आरोप होता. या विरोधात बोलताना पंतप्रधान हसीना यांनी नोकऱ्या स्वातंत्र्यसैनिकांच्या वारसांना द्यायच्या नाहीत तर रझाकरांच्या वारसांना द्यायच्या काय? असा प्रश्न केला होता. जेव्हा वातावरण तापलेले आहे त्या काळात असे बोलणे योग्य ठरत नाही. मात्र प्रदीर्घकाळ सत्तेवर असणाऱ्या आणि शेख मुजिबूर रहमान यांची कन्या असलेल्या हसिना यांनी काळाचे भान आणि जनतेच्या मनातील भाव जपता आले नाहीत. यापूर्वी निवडणुकीच्या प्रचारादरम्यान त्यांनी विरोधी पक्षाच्या नेत्यांना असेच टोकाचे आव्हान दिले होते. अर्थात ज्या देशातील प्रमुख विरोधी पक्षाने दोन वेळा सार्वत्रिक निवडणुकीवर बहिष्कार टाकत असेल तिथला निकाल कोणत्या लोकशाही पद्धतीचा असेल याबद्दल फार बोलण्याची गरज नाही. लष्कराची किंवा लष्कराच्या हातातल्या बाहुल्यांची सत्ता येण्यापूर्वी येथे खूप चांगली लोकशाही नांदत होती, असे शेख हसीना यांच्या कारभाराकडे पाहिल्यानंतर दिसत नाही. त्यांच्या कारभाराला विरोध करणारे ८० हून अधिक लोक बेपत्ता होणे हा हुकूमशाहीतीलच एक प्रकार म्हटला पाहिजे. त्यात भ्रष्टाचाराने कळस गाठल्याने जनतेतून त्यांच्या विरोधात तीव्र आंदोलन उभे राहिले असल्यास आणि त्याला लष्कराने फुंकर घातली असल्यास नवल वाटण्याचे कारण नाही. बांगलादेशातील समाज माध्यमांमध्ये शेख हसिना सरकारच्या माजी वरिष्ठ अधिकाऱ्यांवर झालेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपांची मोठ्या प्रमाणात चर्चा होते आहे. या अधिकाऱ्यांमध्ये माजी लष्करप्रमुख, माजी पोलिस महासंचालक, वरिष्ठ कर अधिकारी आणि नोकरभरती अधिकाऱ्यांचा समावेश आहे. खुद्द शेख हसीना यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये आपल्या घरातील एक शिपाई हेलिकॉप्टरने फिरत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर आपण त्याच्या भ्रष्टाचारा विरोधात कारवाई करायला सांगितले असे जाहीर केले होते. पंतप्रधानांचा घरगडी जर भ्रष्टाचार करून हेलिकॉप्टरमधून फिरत असेल तर त्या राज्यात यंत्रणेचे किती दिवाळे वाजले असेल हे समजून येतेच. प्रदीर्घकाळ सत्ता हातात असल्यामुळे निर्माण झालेली बेफिकिरी, अरेरावी, बेबंद भ्रष्टाचार हा पक्षाच्या तळापासून वरिष्ठांपर्यंतचा स्थायीभाव बनून जातो. तो बनल्यानंतर आपण कसा जगाला हेवा वाटणारा विकास करत आहोत हे दाखवण्यासाठी भांडवलदारांना आणि हितसंबंधितांना हाताशी धरून सुस्थितीचे एक चित्र निर्माण केले जाते. या चित्राकडे बोट दाखवून लोकांची देश भावना जागृत केली जाते आणि त्या भावनेला फुंकर घालत वारंवार सत्ता काबीज केली जाते. प्रसंगी माध्यमांनाही गुलाम बनवले जाते. मात्र, हा बुडबुडा कधी ना कधी फुटतोच. सर्वसामान्य माणसाच्या हाताला काम नसेल आणि त्याचे पोट रिकामे असेल तर त्याला राष्ट्रभावना आणि राष्ट्रप्रथम अशा भुलभुलय्यात फारकाळ ग्रुपफटून ठेवता येत नाही. तो कधी ना कधी बंड करून उठतो. बांगलादेशमध्ये नेमके तेच झाले आहे. यापुढेही बंदुकीच्या जोरावर आपण लोकांना दाबून दुसऱ्या कोणाच्या तरी दावणीला बांधू असे लष्कराला वाटले असले तरीसुद्धा अशा सत्ताही टिकाव धरत नाहीत हे पाकिस्तानमध्ये दिसून आले आहे. लोककल्याणकारी राज्यव्यवस्था ही लोकशाहीमध्ये सर्वोत्तम पद्धतीने राबवता येणे शक्य आहे. मात्र त्यासाठी भ्रष्टाचारावर आणि गैरव्यवस्थापनावर अंकुश हवा. हे असे मुद्दे आहेत जे सदा सर्वकाळासाठी नष्ट होत नाहीत. मात्र, त्यांच्यावर नियंत्रण ठेवता येणे शक्य आहे. सत्ता आपल्याच ताब्यात राहावी म्हणून भ्रष्टाचाऱ्यांना मोकळे कुरण सोडले तर मग सत्ताधाऱ्यांवर अशी पळून जाण्याची वेळ येते.

# दोन राष्ट्रगीतांचे जनक; गुरुदेव रवींद्रनाथ टागोर



श्याम बसप्पा ठाणेदार

आज ७ ऑगस्ट, भारत मातेचे महान सुपूत्र चित्रकार, नाटककार, कादंबरीकार, बंगाली कवी, संगितकार गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांची पुण्यतिथी. रवींद्रनाथ टागोर यांचा जन्म ७ मे १८६१ रोजी कोलकात्यातील जोर - सांको येथे झाला. त्यांच्या आईचे नाव शारदादेवी तर वडिलांचे नाव महर्षी देवेंद्रनाथ टागोर असे होते. रवींद्रनाथ टागोरांनी आपले शिक्षण घरीच विविध विषयांच्या खाजगी शिक्षकांच्या हाताखाली घेतले. त्यांनी लहान वयातच कविता लिहायला सुरुवात केली. वयाच्या आठव्या वर्षीच त्यांनी आपली पहिली कविता लिहिली. वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांनी भानुसिंह या टोपण नावाने बऱ्याचशा कविता लिहिल्या. बॅरिस्टर होण्याआधी त्यांनी लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेज येथे प्रवेश घेतला परंतु १८८० मध्ये कोणत्याही पदवी शिवाय ते बंगालमध्ये परतले. १४ नोव्हे १९१३ रोजी गीतांजली या रचनेबदद्ल स्वीडीश अकादमीचा नोबेल पुरस्कार त्यांना देण्यात आला. गीतांजलीचे भाषांतर स्वतः रवीन्द्रनाथांनीच केले होते. रवींद्रनाथ हे भारताचे व आशियाचे पहिले नोबेल विजेते होत. १९१५ साली त्यांना ब्रिटीश सरकारने "सर" ही पदवी दिली. १९१९ च्या जालियनवाला बाग हत्याकांडानंतर त्यांनी ती सरकारला परत केली. रवीन्द्रनाथांनी रचलेली जन गण मन व आमार शोनार बांग्ला ह्या रचना अनुक्रमे भारत व बांगलादेश यांची राष्ट्रगीते म्हणून स्वीकारण्यात आल्या आहेत. दोन राष्ट्रगीतांचे जनकत्व असलेले रवीन्द्रनाथ हे जगातील एकमेव कवी आहेत. पारंपारिक शिक्षण केवळ पोपटपंची शिकवते या विचारातून शांतिनिकेतनाचा क्रांतिकारक प्रयोग त्यांनी राबवला. रविंद्रनाथकालीन भारतामध्ये सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक चळवळींचे प्रमुख केन्द्रांपैकी एक असलेल्या महाराष्ट्राचा प्रभाव रवींद्रनाथांवरही पडला होता. संत तुकारामांच्या साहित्याचा त्यांनी अभ्यास केला होता. संत तुकारामांचे काही अभंग त्यांनी बंगाली भाषेत अनुवादित केले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनही त्यांच्या साठी प्रेरणास्थान होते. छत्रपती शिवाजी महाराजांवर त्यांनी एक खंडकाव्यही रचले आहे. शांतीनिकेतनाची उभारणी, विस्तृत व उच्च दर्जाच्या साहित्याची निर्मिती व रवीन्द्रसंगीताचे सृजन हे रवीन्द्रनाथांचे प्रमुख जीवनकार्य होय.

रवींद्रनाथ टागोरांना गुरुदेव असे संबोधले जाते, १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या प्रारंभी रवींद्रनाथांच्या कार्यामुळे बंगाली साहित्यात व बंगाली संगीतात आमूलाग्र बदल घडून आला. बंगाली साहित्याची रवींद्रपूर्व व रविंद्रोत्तर अशी विभागणी केली जाते यावरून बंगाली साहित्यावर रवींद्रनाथांच्या प्रभाव लक्षात येतो. एक महान कवी असण्यासोबतच ते एक महान देशभक्त होते त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात मोठ्या संख्येने भारतीय लोकांना प्रभावित केले. ७ ऑगस्ट १९४१ रोजी रवींद्रनाथ टागोर यांचे निधन झाले. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांना पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन.

# रस्ते आणि खड्डे यांचे सूत पावसाळ्यांत कां जुळून येते?



राजन पांजरी

पृथ्वीवरील प्रत्येक सजीवाचे जीवन परावलंबी असते. आपल्या देशातील लोकांचे जीवन पावसाळ्यात पडणाऱ्या पावसावर जास्त प्रमाणात अवलंबून असते. तरीही रस्त्यांवर साठणाऱ्या पावसाच्या पाण्याने रस्त्यांची दुर्दशा होते त्याला वाढता पाऊस दोषी असल्याचे म्हटले जाते. रस्त्यांवर खड्ड्यांचे प्रमाण एवढे वाढते की त्या खड्ड्यांत रस्ते शोधण्याची वेळ प्रत्येक वाहनचालकाला येते. महामार्गांच्या देखभालीसाठी सर्वत्र टोल वसुल करण्यात येतो.

जमा झालेल्या टोल रकमेतील अंदाजे २५ टक्के रक्कम जर महामार्गांच्या नियमित देखरेखीसाठी वापरला गेल्यास पावसाळ्यात सध्याच्या प्रमाणात पसरले जाणारे खड्ड्यांचे साम्राज्य दिसू शकणार नाही. परंतु वाढते तंत्रज्ञान आणि रस्ते निर्मिति व दुरूस्ती करणाऱ्या कंत्राटदारांवर असलेला सरकारी अधिकाऱ्यांचा वचक विचारात घेता अशी परिस्थिती कधीही उद्‌भवू नये अशी सामान्यजनांची अपेक्षा असते. कंत्राटदारांवर ठराविक मुदतीत मार्गांचे काम पूर्ण करणे व त्या कामाचा दर्जा व टिकाऊपणा राखणे याविषयी बऱ्याच अटी घातलेल्या असतात तरीही रस्त्यांची अवस्था/परिस्थिती खड्डेमय कां होते त्यावर कुणीच जाब विचारत का नाहीत असे प्रश्न उपस्थित होतात.

रस्ते, महामार्गांवरून दररोज किती वाहने ये जा करतील याचा अंदाज घेऊनच त्यांची बांधणी केली जात असते. त्या वाहनांचा भार सहन करण्याची क्षमता नसल्यास एकतर रस्ता बांधतांना बांधकाम साहित्याचा दर्जा राखला गेला नसावा किंवा त्यावरून ये जा करणाऱ्या वाहनांचा अंदाज घेण्यात गफलत/वाढ झाली असण्याची शक्यता असू शकते. त्याशिवाय रस्त्यांची नियमित तपासणी करून डागडुजी केली जात नसल्यास रस्त्यांची चाळण होऊ शकते.

रस्त्यांच्या बांधकामाविषयी निर्माण होणाऱ्या तक्रारींवर कंत्राटदारांशी केलेल्या करारांतील अटींनुसार कायदेशीर कारवाई करणे शक्य असते. पण तिथेही दुर्लक्ष केले जात असल्याने रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांची दुरूस्ती रखडते आणि वाहनचालक आणि प्रवासी यांना खड्ड्यांतील प्रवास करणे अनिवार्य होते. परिणामी वाहनांतील बिघाड आणि प्रवाशांच्या दुखापतींत भर पडत रहाते. रस्ते व महामार्ग बांधून पूर्ण होण्यापूर्वीच तेथे टोल नाक्यांची उभारणी प्राधान्याने केली जाते, परंतु ज्या रस्त्यांसाठी टोल आकारणी केली जाणार आहे त्याच्या दर्जाची, प्रवाशांच्या सोयीसाठी आवश्यक असणारी व्यवस्था पूर्ण झाली आहे का याचा तपास केला जात नाही.

आपल्याकडील राजकीय आणि समाजव्यवस्थेने अशा प्रकारच्या सवयींशी एवढे जुळवून घेणे भाग पाडले आहे की त्यावरून निसर्गात होऊ घातलेल्या बदलांची आठवण समाजाला होते. जसे पावसाळ्यापूर्वी नाल्यांची साफसफाई, रस्त्यांवरील लहान मोठ्या खड्ड्यांत डांबर ओतून खड्डे बुजविण्याचे महत्कर्म पार पाडले जाते. तत्पूर्वी उन्हाळ्यात पाणी टंचाई जाणवू लागताच टँकर्सने गावागावांतून पाणी पुरवठा करण्याचे श्रेय घेण्यात स्पर्धा होतात. जसा टोल वसुलीचा उपयोग प्रत्यक्ष रस्ते महामार्गांची निगा वा देखभाल करण्यासाठी वापरलाच जातो याची हमी कोणी देऊ शकत नाही त्याप्रमाणे उन्हाळ्यात पाणी पुरवठा, पावसाळ्यापूर्वी नालेसफाई, रस्त्यांवरील खड्ड्यांची डांबर ओतून डागडूजी करणे ह्या तात्पुरत्या स्वरुपाच्या दुरुस्त्यांमुळे सामान्यजनांना तक्रार करण्यास काही जागा राहणार नाही याची काळजी घेतली जाते ती गैरकारभार व भ्रष्टाचारात गुंतलेल्या प्रशासकीय व्यवस्थेकडून.

मुंबई - पुणे महामार्गासारखे मार्ग राज्यभर बांधल्यास टोल आकारणीस होणारा विरोध काही प्रमाणात कमी होऊ शकतो, परंतु तिथेही राजकारण केले जाते. सुरुवातीस विरोध करतात तेच आपल्या सत्ताकाळात टोलचे समर्थन करतात. या टोल वसुलीचा विनियोग रस्ते, महामार्ग यांच्या देखभालीसाठी न होता टोलची कंत्राटे विनाअडथळे सुरू रहावीत याकरीता सर्व संबंधितांची मर्जी संपादन करण्यासाठी वापरला जात असावा असा अनेकांचा कयास आहे.

यावर्षीच्या पावसाळ्यात मुंबई नासिक महामार्गाची चाळण झाली तिथे वाहनांचे अपघात झाले आणि निर्माण झालेल्या वाहतूक कोंडीवर मार्ग काढण्यास एक दोन दिवस पुरेसे नाहीत हे समजून चुकले आहे. अशावेळी या महामार्गावर वसूल केलेला अंदाजे दोनशे कोटींहून अधिक रुपयांचा टोल नेमका कोणत्या कारणांसाठी वापरला गेला आहे? यांवर उत्तरे सापडणे हे टोल देणाऱ्या प्रवाशांना व बातम्या, सोशल मीडिया माध्यमांवर प्रसिद्ध होणाऱ्या चित्रफितींतील दृश्यांमधून नजरेस पडणारी रस्त्यांची अवस्था पाहणाऱ्या जनतेला कठीण होऊन बसत आहे. कुणीतरी हे सर्व समजून घेईल की हे सारे प्रकार असेच सुरू राहणार आहेत.!

# वाचकांची पत्रे

## धाक वाटावयास हवा!

मुंबईत ड्रंक अँड ड्राईव्हच्या घटनांची संख्या वाढते आहे. जानेवारी ते जुलै २०२३ या कालावधीत केवळ ४०७ जणांवर कारवाई झाली होती मात्र ाच कालावधीत २०२४ मध्ये हीच संख्या ४४७ वर पोहचली, शिवाय वाढत्या वाहनांबरोबरीने नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चालकांची संख्या वाढते आहे. ही बाब तितकीच गंभीर तर आहेच पण चिंता व्यक्त करणारी आहे. कायदा, नियम यांचा धाक न वाटणे, भरलेल्या खिशातून दंड भरला की बस्स ही वाढती मनोवृत्ती यामागे तयार झालेली असावी असे म्हटल्यास ते चुकीचे होईल असे नाही. आणि म्हणूनच कायदा, नियम मोडणाऱ्यांना, ड्रंक अँड ड्राईव्ह करणाऱ्या चालकांना कायदा, नियमांचा धाक वाटायला हवा, आपली आता धडगत नाही अशी धडकी बसवणारी कडक नियमांची अंमलबजावणी जेव्हा होईल नव्हे होणे गरजेचे आहे तेव्हाच कुठे इतरांना प्राणघातक ठरणा-या घटनांना आळा बसेल असे वाटते.

**- विश्वनाथ पंडित, ठाणे**

## बांगला देशाबद्दल सावध पवित्रा घेणे भारताच्या हिताचे

भारताच्या शेजारी असलेल्या बांगलादेशाच्या पंतप्रधान शेख हसिना वाजेद यांनी नुकताच अचानक राजीनामा देवून देश सोडला आहे. आपल्या देशात आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलने होत असतात मात्र बांगला देशात आरक्षण रद्द करावे म्हणून गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेल्या आंदोलनात ३०० हुन अधिक लोकांचा बळी गेला आहे शेख हसिना यांनी आतापर्यंत अनेक आंदोलने यशस्वीपणे हाताळून विरोधकांचा आवाज बंद केलेला आहे. बांगलादेशमध्ये हिंदूच्या मंदिरांच्या विरोधात आंदोलन असो अगर भारताविरोधी किंवा विरोधी पक्षांचे आंदोलन हसिना यांनी उत्तम प्रकारे हाताळून देशामध्ये शांतता प्रस्थापित केली होती मात्र बांगला देशात १९७१ च्या. स्वातंत्रलढ्यात लढणाऱ्या सैनिकांच्या मुलांसाठी सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षणाची तरतूद आहे. भारताच्या मदतीने बांगलादेशाला पाकिस्तानपासून मुक्ती मिळाली आहे मुक्ती युद्धात लढणाऱ्यांना मुक्ती योद्धे म्हंटले जाते सरकारी नोकऱ्यांमधील ३० टक्के जागा मुक्ती युद्ध लढणाऱ्या सैनिकांच्या मुलांसाठी आरक्षित आहेत त्या विरोधात विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरू केले आहे. आरक्षणाची व्यवस्था भेदभाव करणारी असून नोकरी गुणवत्तेच्याचं आधारे मिळावी अशी त्यांची मागणी आहे बांगलादेशात २०१८ मध्ये हि आरक्षण व्यवस्था रद्द करुन ते पाच टक्के केले होते देशांतील ९३ टक्के पदे गुणवत्तेनुसार, दोन टक्के पदे वांशिक अल्पसंख्याक, पारलिंगी व्यक्ती आणि अपंगासाठी राखीव असतील असा आदेश राजधानी ढाका येथील उच्च न्यायालयाने दिला होता पण ते पाच टक्केहि आरक्षण रद्द करावे म्हणून बांगलादेश पेटला आहे. बांगलादेश संबंधांना आणि मैत्रीला ऐतिहासिक आणि सांस्कृतिक अधिष्ठान असले तरी बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीने भारतावर विविध आरोप केले आहेत. त्यामुळे बांगलादेशाबद्दल सावध पवित्रा घेणे गरजेचे आहे.

**- राजू जाधव, मांगूर जिल्हा बेळगांव**

## नशिबाचा खेळ की नशिबाचा विनोद?

भारताचा माजी क्रिकेटपटू विनोद कांबळीचा मन हेलावून टाकणारा एक व्हिडिओ सध्या समाजमाध्यमावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे. या व्हिडिओमध्ये विनोद कांबळीला त्याच्या पायावर धड उभेही राहता येत नसल्याचे दिसत असून त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाल्याचे दिसत आहे. विनोद कांबळी याची तब्येत बरी नसून प्रकृती अस्वास्थामुळे त्याला याआधी अनेकदा रूग्णालयात दाखल करण्यात आल्याचे सांगण्यात येते. ९० च्या दशकात शालेय क्रिकेट सामन्यात त्याने सचिन तेंडुलकरसोबत विक्रमी ६६४ धावांची भागीदारी करून अवघ्या क्रिकेटविश्वाचे लक्ष वेधून घेतले. त्याची कसोटी कारकिर्द सचिननंतर तीन वर्षांनी सुरु झाली असली तरी पहिल्या सात कसोटी सामन्यातच दोन द्विशतकांसह त्याने चार शतके ठोकून स्वप्नवत कामगिरी केली. तीन वेगवेगळ्या देशांविरुद्ध तीन डावात सलग तीन कसोटी शतके ठोकणारा तो एकमेव भारतीय क्रिकेटपटू आहे. कसोटीत सर्वात जलद १४ डावात १००० धावा पूर्ण करण्याचा भारतीय विक्रमही त्याच्याच नावावर आहे. मात्र त्याचा शालेय मित्र सचिन विक्रमी २०० कसोटी सामने आणि सर्वाधिक ४६३ आंतरराष्ट्रीय एकदिवसीय सामने खेळला असताना विनोद कांबळीची कारकीर्द मात्र सातत्याने वादग्रस्त बनून अवघ्या १७ कसोटी आणि १०४ वनडे सामन्यांनंतर संपुष्टात आली. याला नशिबाचा खेळ नाही तर काय म्हणावे?

**- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी**

## ॐ कपड्यांवर नको!

हल्ली ॐ नमः शिवाय । हा मंत्रजप लिहिलेले सदरे, शर्ट्स तयार कपड्यांच्या दुकानात विक्रीला ठेवलेले पाहायला मिळतात. महाशिवरात्र आणि श्रावण महिन्याच्या दरम्यान ऑनलाईन संकेतस्थळांवरसुद्धा अशा कपड्यांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते. बारा ज्योतिर्लिंग तसेच भगवान शिवाची पुरातन मंदिरे ज्या ठिकाणी आहेत अशा ठिकाणी या स्वरूपाच्या कपड्यांचे स्टॉल्स पाहायला मिळतात. महाशिवरात्रीनिमित्त प्राचीन शिवमंदिराच्या ठिकाणी भरणाऱ्या जत्रांमध्ये सुद्धा 'ॐ नमः शिवाय ।' मंत्रजप प्रिंट केलेले कपडे विक्रीसाठी ठेवलेले दिसून येतात, ज्यांना तरुणवर्गाकडून अधिक पसंती दिली जाते. अंगभर ॐ नमः शिवाय । हा मंत्रजप लिहिलेले सदरे परिधान करण्याची आता जणू फॅशनच येत चालली आहे. जीन्स पॅन्टवर अशा प्रकारचे सदरे घातलेले तरुण हल्ली सर्वत्र पाहायला मिळतात. 'ॐ नमः शिवाय ।' हा भगवान शिवाचा मंत्रजप असून याच्या नियमित स्मरणाने शिव प्रसन्न होऊन आपली मनोकामना पूर्ण करतो असे म्हटले जाते. यामध्ये ओम हा बीजमंत्र असल्याने या मंत्रात शक्तीही तेव्हढ्या प्रमाणात सामावलेली असते. त्यामुळे तो श्रद्धेने स्मरावा असे धर्मशास्त्र सांगते. धर्मशास्त्रानुसार ज्या ठिकाणी देवतेचे नाम अथवा प्रतिमा असते त्या ठिकाणी त्या देवतेचे शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध आणि त्या देवतेची शक्ती कार्यरत असते. ॐ नमः शिवाय 1 सारख्या या शक्तिशाली मंत्राचा हल्ली कपड्यांवर होत असलेला सुमार वापर मनाला खटकणारा आहे. मंत्रजप छापलेले कपडे घालून आपण आवश्यक ती शुचिर्भूतता पाळतो का? अशा प्रकारचे कपडे परिधान करून आपण कोणत्याही अपवित्र स्थळी जात असू, मद्यपान, धूम्रपान करत असू, मुक्तपणे वावरत असू तर तो प्रत्यक्ष शिवाचाच अवमान आहे. अंगाला येणाऱ्या घामामुळे घातलेल्या कपड्यांना दुर्गंध येऊ लागतो. असे कपडे अन्य कपड्यांसोबत धुतांनाही आपण विशेष काळजी घेत नाही. एकीकडे आपली शिवभक्ती दाखवण्यासाठी अशा प्रकारचे कपडे घालायचे आणि दुसरीकडे प्रत्यक्ष शिवाचाच अवमान करायचा अशाने शिवाची कृपा आपल्यावर होईल का? भक्ती ही मनापासून करावी, त्यासाठी हिंदू धर्मात अनेक मार्ग सांगण्यात आले आहेत. अशा प्रकारे मंत्रजपाचे कपडे परिधान करून आपल्या भक्तीचा देखावा करू नये. अशा प्रकारचे कपडे तयार करून ते विक्रीसाठी ठेऊन व्यापारी वर्ग आपला व्यवसाय वाढवू पाहतात आणि आपल्यासारखे भगवान शिवाचे भक्त हे कपडे चढ्या दरात विकत घेतात. त्यामुळे भगवान शिवाचा मंत्रजप छापलेले कपडे विकत घेणे आणि ते परिधान टाळायला हवे. त्याऐवजी ॐ नमः शिवाय हा मंत्रजप श्रावणात अधिकाधिक करायला हवा. ज्यामुळे भगवान शिवांची अखंड कृपा आपल्यावर राहिल.

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

## विकासाची वाट अजूनही बिकट

कल्याण-नगर राष्ट्रीय मार्गावर माळशेज घाटाच्या पायथ्याशी असलेल्या मुरबाड तालुक्यातील फांगुळगव्हाण या आदिवासी गावातील ग्रामस्थांनी श्रमदानातून ओढ्यावर पूल बांधल्याची बातमी वाचनात आली आणि स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा झाल्यानंतरही विकासाची वाट अजूनही दुर्गम भागात बिकट असल्याचे चित्र समोर आले. चिंतेची बाब म्हणजे या ओढ्यातूनच विद्यार्थ्यांना शाळा गाठण्यासाठी पायपीट करावी लागत असे आणि त्या ओढ्यावर पूल बांधण्यासाठी वारंवार मागणी करुनही प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचे कळते. एकीकडे समृद्धी महामार्ग, विविध द्रुतगती मार्गांचे काम झपाट्याने पार पडत असताना एक छोटा पण आत्यंतिक गरज असलेला पूल प्रशासनाकडून बांधला जाऊ नये ही शोकांतिकाच. ग्रामस्थांनी जरी पूल बांधला असला तरी तो तात्पुरत्या स्वरुपाचा आहे. तरी तिथे प्रशासनाने त्वरित दखल घेऊन तातडीने कायमस्वरुपी पूल बांधावा. आणि विद्यार्थ्यांचा शाळाप्रवासाचा मार्ग सुकर करावा.

**- दीपक काशिराम गुंडये, वरळी**

## पश्चिम घाट पर्यावरण दृष्ट्या सुरक्षित राहावा

सध्या केरळ मधील वायनाड येथील डोंगर कोसळून सुमारे तीनशे हुन अधिक लोकांचे प्राण गेले या शिवाय या भागात वित्तहानी व अनेक जण जखमी झाले. मागील वर्षी महाराष्ट्रात इर्शाळवाडी तसेच काही वर्षांपूर्वी माळीण या भागात सुद्धा डोंगर कोसळून अनेक जण मृत्युमुखी पडले होते. दिवसेंदिवस पश्चिम घाटातील डोंगराचे कोसळण्याचे प्रमाण वाढत आहे. डॉक्टर माधव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली २०१० मध्ये पश्चिम घाटाच्या पर्यावरण रक्षणासाठी एक समिती नेमली होती. या समितीने गुजरात पासून तामिळनाडू येथपर्यंत सहा राज्यांचा पश्चिम घाटातील पर्यावरण संदर्भात सखोल अभ्यास केला.या अहवालानुसार पश्चिम घाटातील एक लाख २९ हजार चौरस किलोमीटर परिसर पर्यावरणाच्या दृष्टीने सुरक्षित ठेवण्याच्या सूचना केल्या त्यांनी अतिसंवेदनशील मध्यम संवेदनशील व कमी संवेदनशील अशी तीन विभागात विभागणी केली. अतिसंवेदनशील भागात कोणत्याही परिस्थितीत भौगोलिक बदल, करू नयेत तसेच खाणकाम वाळू उत्खनन करू नये असावीं औष्णीक प्रकल्प उभे करू नयेत अशा सूचना दिल्या होत्या या गाडगीळ समितीला पश्चिम घाटातील शिफारशींना विविध पक्षाच्या सहा सरकारांनी विरोध केला. केरळ मध्ये रबर लागवड, बेसुमार वाळू उपसा, या गोष्टी चालू आहेत तर कर्नाटकात रस्ते, वीज प्रकल्प महाराष्ट्रात रस्ते बांधणीसाठी खोदकाम तर गोव्यात खनिज खाणी ही कामे चालू आहेत ही बातमी नुकतीच वाचली. पश्चिम घटनांबाबत गेली सुमारे चाळीस वर्षे अनेक शास्त्रज्ञ तसेच पर्यावरण वादी या बाबत इशारे देत आहेत. पश्चिम घाट बचाव मोहीम सुद्धा सुरु झाली आहे. वास्तविक पश्चिम घाट हा नैसर्गिक व जैविक वैविध्याचे आगारच आहे शिवाय या भागात नैसर्गिक रित्या जगण्याची तेथील लोकांची परंपरा आहे.त्यालाच तेथील झालेले बांधकाम व इतर गोष्टी ह्या मोठया हानीकारक आहेत. भौतिक विकासाच्या नावाखाली निसर्गाला ओरबाडून खाण्याची वृत्ती वाढीस लागली आहे आता वायनाड घटनेनंतर सरकारने एक अधिसूचना जारी केली आहे. त्यातील शिफारसी तरी अमलात येणार का? एकूणच निसर्गाच्या विरुद्ध असे आपण वागत आहोत व त्याची शिक्षाही आपणास अनेक घटनांनी आपणास मिळत आहे. असे असतांहि आपण केव्हा जागे होणार? व निसर्गाप्रमाणे वागणार हा खरा प्रश्न आहे.

**- शांताराम वाघ, पुणे**

## सुप्रीम कोर्टाचा निकाल अपेक्षित

भारताची राजधानी दिल्ली आहे आणि म्हणूनच दिल्लीच्या रक्षणासाठी अमर्यादित असलेले घटनात्मक अधिकार व जवाबदारीचा अनुभव वेळप्रसंगी येत असतो. असाच अनुभव आप म्हणजेच आम आदमी पार्टीला दिल्ली मनपात आला आहे. दिल्ली मनपात सर्वाधिक नगरसेवक 'आप' चेच आहेत आणि त्यानंतर दुसऱ्या नंबरावर भाजपा चे आहेत. दिल्लीचे नायब राज्यपालानी मागील वर्षी त्यांच्या स्वतःच्या अधिकारात दहा नामनिर्देशित नगरसेवकांची नियुक्ती केली होती आणि या त्यांच्या कृतीला आपच्या महापौरानी कोर्टात आव्हान दिले होते. आपल्या घटनेत राज्यपाल आणि राष्ट्रपती याना स्पष्ट व सर्वोच्च अधिकार दिलेले आहेत तेव्हा अशा अधिकाराना प्रत्येक वेळेला न्यायालयात आव्हान देणेच कायम चुकीचे आहे म्हणूनच सुप्रीम कोर्टाने आपची याचिका फेटाळून लावली व नायब राज्यपालाचे अधिकार म्हणजेच नामनिर्देशित दहा नगरसेवक नियुक्ती करणे पूर्णपणे योग्य असल्याचे निकालात म्हटले आहे म्हणजेच निकाल अपेक्षित होता असे वाटते.

**- संजय गंगाराम साळगांवकर, कुर्ला**

# नीरज चोप्राने थेट गाठली फायनल

**नवी दिल्ली, दि. ०६ (वृत्तसंस्था) :** भारताचा गोल्डन बॉय नीरज चोप्राकडून संपूर्ण देशाला मोठ्या आशा आहेत आणि पॅरिस ऑलिम्पिकच्या भालाफेक स्पर्धेला सुरुवात झाली आहे. आजच्या या स्पर्धेमध्ये नीरज चोप्राने जगाला दाखवून दिले की का तो डिफेंडिंग चॅम्पियन आहे. आज नीरज चोप्राने दुसऱ्या गटामधील पहिला थ्रो त्याने केला आणि चमत्कार करून दाखवला. भारतीय स्टार नीरज चोप्राचा पहिला थ्रो त्याने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये टाकला आणि त्याच्या भाल्याने ८९.३४ मीटर अंतर पार करून फायनल गाठली आहे भारताच्या प्रेक्षकांना नेहमीच नीरज चोप्राकडून मोठ्या अपेक्षा असतात. त्यावर तो टोकियो ऑलिम्पिकनंतर त्याने बरेच त्याच्या खेळामध्ये सुधारणा केली आहे, त्याचबरोबर त्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर मेडलची कमाई केली आहे. पाकिस्तानच्या अर्शद नदीमनेही अंतिम फेरीत आपले स्थान पक्के केले.

### नीरज चोप्रा पहिला थ्रो

किशोर जेनाने पहिला थ्रो ८०.७३ मीटर त्याचा भाल्याने अंतर पार केले आहे तर दुसरा थ्रो त्याचा फाऊल झाला आहे. त्यानंतर आता त्याने तिसरा थ्रो ८०.२१ मीटर टाकला आहे. आता तो फायनलसाठी पात्र ठरणार की नाही हे पाहणे महत्वाचे ठरेल. पॅरिस ऑलिम्पिक २०२४ ची फायनलची स्पर्धा ८ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा भारतीय वेळेनुसार रात्री ११:५५ ला सुरू होणार आहे. त्यामुळे भारतीय प्रेक्षक नीरज चोप्राकडून आणखी एक सुवर्ण पदकाची अपेक्षा करत आहेत. कारण त्याने क्वालीफिकेशन राउंडमध्ये ८९:३४ मीटर भाला फेकला आहे.



# मराठमोळा धावपटू अविनाश साबळे अंतिम फेरीत

### पुरुषांच्या ३००० मीटर स्टीपलचेस फायनल गाठणार पहिला भारतीय



**नवी दिल्ली, दि. ०६ (वृत्तसंस्था) :** भारतीय ॲथलीट अविनाश साबळे याने पॅरिस ऑलिम्पिकमधील ३००० मीटर स्टीपलचेस स्पर्धेच्या पात्रता फेरीत चमकदार कामगिरी करून अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले आहे. पॅरिस ऑलिम्पिक २०२४ च्या १० व्या दिवशी, भारतीय ॲथलीट अविनाश साबळे याने इतिहास रचला आणि ३००० मीटर स्टीपलचेस स्पर्धेच्या पात्रता फेरीत आपल्या चमकदार कामगिरीसह अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले.

पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये भारतासाठी १०व्या दिवसाचा शेवट खूपच नेत्रदीपक होता. भारतीय ॲथलीट अविनाश साबळेने पुरुषांच्या ३००० मीटर स्टीपलचेस स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. ऑलिम्पिकमध्ये या स्पर्धेत अंतिम फेरी गाठणारा तो पहिला भारतीय ठरला आहे. साबळेने तिच्या हीटमध्ये ८:१५.४३ मिनिटांच्या वेळेसह ५ वे स्थान मिळवले आणि इव्हेंटमध्ये पहिल्या १५ मध्ये प्रवेश केला. स्टीपलचेसमध्ये तीन हीट असतात आणि प्रत्येक हीटमधील अव्वल पाच खेळाडू अंतिम फेरीसाठी पात्र ठरतात. साबळे आता ७ ऑगस्ट रोजी दुपारी १.१३ वाजता होणाऱ्या या स्पर्धेच्या अंतिम फेरीत दिसणार आहे.

### विनेशने सेमीफायनलमध्ये केला प्रवेश



विनेश फोगटने महिलांच्या फ्रीस्टाइल ५० किलो गटात उपांत्यपूर्व फेरीत ओक्साना लिवाचचा पराभव करीत पुन्हा एकदा चमकदार कामगिरी केली. ओक्सानाने शेवटच्या क्षणी विनेशवर दबाव आणला पण विनेश फोगटने जबरदस्त खेळ करीत युक्रेनची कुस्तीपटू ओक्सानाला चारीमुंड्यात चित करीत विजय प्राप्त केला. ५० किलो वजनी गटात विनेशने मिळवलेले यश अभूतपूर्व आहे. आज भारतीय हॉकी संघाचा महत्त्वाचा सामना आज खेळवला जाणार आहे. आज भारतीय हॉकी संघ जर्मनीविरुद्ध उपांत्य फेरीचा सामना खेळणार आहे.

### भारताचा माजी क्रिकेटपटू विनोद कांबळीची आरोग्य स्थिती खालावली

**नवी दिल्ली, दि. ०६ (वृत्तसंस्था) :** भारताचा माजी क्रिकेटपटू विनोद कांबळी बऱ्याचदा सोशल मीडियावर त्याच्या खासगी जीवनामुळे चर्चेत पाहायला मिळाला आहे. त्यामुळे त्याला सोशल मीडियावर अनेकदा ट्रोलिंगचा सामना करावा लागला आहे. आता सोशल मीडियावर विनोद कांबळीचा एक फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. इंस्टाग्रामवरचे प्रसिद्ध मीडिया अकाउंट व्हायरल भयानीने एक पोस्ट शेअर केली आहे यामध्ये भारताचा माजी क्रिकेटर विनोद कांबळीला दोन व्यक्ती पकडून नेताना दिसत आहेत. हे क्रिकेट समुदायासाठी हे दुःखदायक दृश्य आहे.

व्हायरल भयानीने शेअर केलेल्या पोस्टमध्ये क्रिकेटपटू विनोद कांबळीला दोन व्यक्ती पकडून नेत असल्याचा फोटो व्हायरल होत आहे. भारताचा माजी क्रिकेटपटू विनोद कांबळी अलीकडेच एका व्हायरल व्हिडिओमध्ये दिसला होता की, तो चालण्यासाठी धडपडत होता आणि त्याला उभे राहण्यासाठी मदतीची आवश्यकता होती. यामुळे त्यांच्या आरोग्याबाबत चिंता निर्माण झाली आहे. त्याच्या प्रकृतीचे नेमके कारण अस्पष्ट असले तरी, त्याच्या चाहत्यांसाठी हे दुःखदायक दृश्य आहे.

## सेमीफायनलमध्ये भारत विरुद्ध जर्मनी रंगणार सामना

**नवी दिल्ली, दि. ०६ (वृत्तसंस्था) :**भारतीय हॉकी संघाने ऑलिम्पिकच्या टप्प्यावर नेहमीच वर्चस्व गाजवले आहे. टोकियोपूर्वी संघाने हा वारसा कुठेतरी गमावला होता, पण पुन्हा एकदा भारतीय हॉकी संघ पुन्हा वैभवात परतला आहे. हा मार्ग तितका सोपा नसला तरी आता त्याचे लक्ष्य सोने आहे. उपांत्य फेरीच्या लढतीत विश्वविजेत्या जर्मनीचे कडवे आव्हान आहे. टोकियो ऑलिम्पिकमध्ये भारताने जर्मनीला हरवून कांस्यपदक जिंकले होते आणि आता पुन्हा एकदा जर्मनीला हरवून भारताला नवा इतिहास रचण्याची संधी आहे.



या ऑलिम्पिकमध्ये भारताचा फॉर्म उत्कृष्ट राहिला असून ते सुवर्णपदकांचे प्रबळ दावेदार मानले जात आहेत. भारताने सहापैकी पाच सामने जिंकले आहेत. याचे सर्वात मोठे कारण म्हणजे पीआर श्रीजेशचे स्मार्ट गोलकिपिंग आणि पेनल्टी कॉर्नरचे गोलमध्ये रूपांतर करण्यात भारतीय खेळाडूंचे रूपांतरण दर. पूर्वीच्या तुलनेत भारतीय संघाने यामध्ये बरीच सुधारणा केली आहे. जर्मनी आणि भारत यांच्यातील स्पर्धा आतापर्यंत निकराची होती. प्रत्येक सामन्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत दोन्ही संघ लढताना दिसले. जर्मनीविरुद्धच्या या महत्त्वाच्या सामन्यात भारतासमोरील सर्वात मोठे आव्हान आपल्या बचावफळीवर मात करण्याचे असेल, त्यामुळे भारतीय मिडफिल्डरची भूमिका महत्त्वाची असेल. आकडेवारीबद्दल बोलायचे झाले तर जर्मनीविरुद्ध भारताचा वरचष्मा आहे. भारत आणि जर्मनी यांच्यात आतापर्यंत १८ सामने खेळले गेले आहेत, ज्यामध्ये भारताने ८ तर जर्मनीने ६ सामने जिंकले आहेत. ४ सामने अनिर्णित राहिले. तथापि, त्यांचा शेवटचा सामना प्रो-लीगमधील होता, ज्यामध्ये जर्मनीने ३-२ असा विजय मिळवला.

# सत्तावीस वर्षानंतर श्रीलंकेने भारतीय संघाला पराभवाची धूळ चारली

**नवी दिल्ली, दि. ०६ (वृत्तसंस्था):** टी२० मालिकेप्रमाणे भारतीय संघ वनडे मालिकेतही कामगिरी करेल अशी अपेक्षा होती. पण क्रीडारसिकांचा अपेक्षाभंग झाला आहे. दिग्गज खेळाडू असूनही श्रीलंकेने पराभवाची धूळ चारली. पहिला सामना बरोबरीत सोडवल्यानंतर, दुसऱ्या सामन्यात भारताला ३२ धावांनी पराभूत केलं. पहिला सामना बरोबरीत सोडवल्यानंतर, दुसऱ्या सामन्यात भारताला ३२ धावांनी पराभूत केलं.

तीन वर्षानंतर श्रीलंकेने भारताविरुद्ध एकदिवसीय सामना जिंकला. तर चरित असलंकाच्या नेतृत्वाखाली श्रीलंकन संघ भारताविरूद्धची चालत आलेली परंपरा मोडीत काढणार आहे.




तीन वर्षानंतर श्रीलंकेने भारताविरुद्ध एकदिवसीय सामना जिंकला. तर चरित असलंकाच्या नेतृत्वाखाली श्रीलंकन संघ भारताविरूद्धची चालत आलेली परंपरा मोडीत काढणार आहे.

श्रीलंकेने तिसरा सामना जिंकला तर २७ वर्षांनंतर भारताविरुद्ध वनडे मालिका जिंकणार आहे. पहिल्या दोन सामन्यांमध्ये श्रीलंकेने जबरदस्त कामगिरी केली आहे. आता तिसऱ्या सामन्यातही तशीच कामगिरी तर भारताला पराभूत करू शकतात. श्रीलंकेने तिसरा सामना जिंकला तर २७ वर्षांनंतर भारताविरुद्ध वनडे मालिका जिंकणार आहे. पहिल्या दोन सामन्यांमध्ये श्रीलंकेने जबरदस्त कामगिरी केली आहे. आता तिसऱ्या सामन्यातही तशीच कामगिरी तर भारताला पराभूत करू शकतात. श्रीलंकेने भारताविरुद्ध अखेरची द्विपक्षीय वनडे मालिका १९९७ मध्ये जिंकली होती. त्यावेळी अरविंद डी सिल्वा, सनथ जयसूर्या, अर्जुन रणतुंगा, मुथय्या मुरलीधरन असे दिग्गज खेळाडू संघात होते. श्रीलंकेने भारताविरुद्ध अखेरची द्विपक्षीय वनडे मालिका १९९७ मध्ये जिंकली होती. त्यावेळी अरविंद डी सिल्वा, सनथ जयसूर्या, अर्जुन रणतुंगा, मुथय्या मुरलीधरन असे दिग्गज खेळाडू संघात होते. तीन सामन्यांच्या मालिकेतील तिसरा आणि शेवटचा सामना ७ ऑगस्ट रोजी होणार आहे. या सामन्यासाठी भारतीय प्लेइंग इलेव्हनमध्ये बदल होण्याची शक्यता आहे. रियान पराग आणि ऋषभ पंतला संधी मिळू शकते

## ‘सन ऑफ सरदार २’ चे शूटिंग सुरु



सन ऑफ सरदार, एसएस राजामौली दिग्दर्शित मर्यादा रामण्णा चित्रपटाचा हिंदी रिमेक, २०१२ च्या हिट चित्रपटांपैकी एक आहे. अजय देवगण आणि संजय दत्त यांनी कॉमेडी-ॲक्शन ड्रामामध्ये महत्त्वाच्या भूमिका केल्या होत्या. या चित्रपटाचा सीक्वल तब्बल १२ वर्षांनंतर प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे. चाहत्यांना हा चित्रपट पाहण्याची आतुरता लागली आहे. या चित्रपटाचे नुकतेच शूटिंगही सुरू झाले आहे.

‘सन ऑफ सरदार २’ या चित्रपटाबद्दल बऱ्याच दिवसांपासून चर्चा आहे. आज अजय देवगणने सेटवरील एक व्हिडिओ शेअर करून चाहत्यांची मने खुश केली आहेत. बॉलीवूडच्या एका अभिनेत्रीनेही या चित्रपटात प्रवेश केला आहे. सेटवरून या अभिनेत्रीची पहिली झलक समोर आली आहे.

‘सन ऑफ सरदार २’ चित्रपटाचे शूटिंग झाले सुरु

अजय देवगणने ‘सन ऑफ सरदार २’ च्या शूटिंगला सुरुवात झाल्याची माहिती सोशल मीडियावर शेअर केली आहे. त्याने सेटवरून मुहूर्त पूजेचा एक व्हिडिओ पोस्ट केला आहे. अभिनेत्याने वाहेगुरुच्या आशीर्वादाने शूटिंग सुरू केल्याचे क्लिपमध्ये दिसत आहे. अजय देवगणचा पुतण्या आणि मुलगा युग देखील चित्रपटाच्या सेटवर नजर आले आहेत.

सेटवर अजय देवगणची अभिनेत्री हातात क्लॅपबोर्ड घेऊन पोज देताना दिसत आहे. त्याचवेळी चित्रपटाचे दिग्दर्शक विजय कुमार अरोरा शूटिंग करताना दिसत आहेत. मुहूर्ताच्या व्हिडिओमध्ये सर्वात धक्कादायक एन्ट्री होती मृणाल ठाकूरची पाहायला मिळाली आहे. ढोल वाजवताना ती पंजाबी भूमिकेत खूप सुंदर आणि शोभून दिसत आहे. हा संपूर्ण व्हिडिओ डान्स आणि मस्तीने भरलेला दिसून येत आहे. व्हिडिओ शेअर करताना अजय देवगणने कॅप्शनमध्ये लिहिले की, “सन ऑफ सरदार २चे शूटिंग सुरु झाले आहे. टीमसाठी प्रार्थना, आशीर्वाद करा.” असे लिहून अभिनेत्याने ही पोस्ट शेअर केली आहे.

संजय दत्त नाही आहेत या चित्रपटाचा भाग?

सन ऑफ सरदारमध्ये अजय देवगणसोबत सोनाक्षी सिन्हा, जुही चावला, संजय दत्त, तनुजा आणि अर्जन बाजवा हे कलाकार मुख्य भूमिकेत होते. मात्र, संजय दत्त सन ऑफ सरदार २ चा भाग नसल्याचं बोललं जात आहे. सोनाक्षी सिन्हाही मुहूर्ताच्या व्हिडिओमध्ये दिसली नाही. काही काळापूर्वी मृणालला तिच्या जागी कास्ट करण्यात आल्याची बातमी आली होती आणि हे व्हिडीओ पाहून हे स्पष्ट देखील झाले आहे.

## ‘खडमोड’ चित्रपट ९ ऑगस्टला महाराष्ट्रात प्रदर्शित होणार

मराठी सिनेसृष्टीत नेहमीच विविध विषयांवरील तसेच लक्ष वेधून घेणारे शीर्षक असलेले चित्रपट बनवले जातात. असाच एक चित्रपट खडमोड हा लवकरच आपल्या भेटीला येतोय. हा चित्रपट ९ ऑगस्ट २०२४ रोजी रिलीज होतोय. या चित्रपटाची प्रेक्षकांमध्ये मोठी क्रेझ देखील बघायला मिळतंय. खडमोड या उत्कंठावर्धक शीर्षकामुळे यात नेमके काय पाहायला मिळेल याचे कुतूहल चाहत्यांमध्ये नक्कीच बघायला मिळतंय. खडमोड हा शब्द प्रामुख्याने नंदूरबार भागातील आहे. याचा अर्थ आता सर्व गोष्टी विनाशाकडे चालल्या आहेत, असा होतो. मानवाने जंगलतोड करून अतिक्रमण केले आहे, ज्याचे दुष्परिणाम दिसू लागले आहेत.

भविष्यात हे सावट आणखी गडद होणार असल्याचे संकेतच या चित्रपटाच्या माध्यमातून देण्यात आले आहेत. जंगलतोडीचा परिणाम वाईल्ड लाईफवर होत आहे. पूर्वीच्या तुलनेत जंगले कमी झाल्याने जंगलातील जनावरे गाव तसेच शहरांकडे वळत आहेत. एखाद्या कॉलनीत किंवा घरात बिबट्या शिरल्याच्या बातम्या आपल्या कानावर नेहमीच येताना दिसतात.

आपण त्यांच्या घरावर अतिक्रमण करत असल्याने त्यांच्याकडे काहीच पर्याय नाही हा चित्रपटाचा बेसिक थॉट असून हाच मेसेज समाजापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न ‘खडमोड’ करणार आहे. एका मुलाच्या माध्यमातून खडमोड चित्रपटाची गोष्ट उलगडत जाणार आहे. नंदूरबारमधील कोकणा आदिवासी समाजातील ही कथा आहे. या समाजातील एका तरुणाचा बैल हरवतो.




बैल शोधण्यासाठी तो जंगलात जातो आणि तो देखील हरवतो. त्यानंतर त्याला बाहेर पडण्यासाठी प्रचंड संघर्ष करावा लागतो. यादरम्यान जे घडते ते पडद्यावर पाहायला मिळेल. आज जंगली जनावरे शहरे आणि गावांमध्ये का येत आहेत? हा आज सर्वांना पडलेला प्रश्न चित्रपटातील एक कॅरेक्टर विचारते. या प्रश्नाचे उत्तर खडमोड चित्रपटात प्रेक्षकांना मिळणार आहे. हा संपूर्ण चित्रपट नंदूरबारमध्ये चित्रीत करण्यात आला आहे.

मेघराज मल्लिनाथ कलशेट्टी यांनी एस्थेट प्रॉडक्शनच्या बॅनरखाली खडमोड चित्रपटाची निर्मिती केली आहे. दिग्दर्शन, पटकथा आणि लेखन राहुल रामचंद्र पवार यांनी केले आहे. संकलन धनेश गोपाळ यांनी केले आहे. या चित्रपटात मुख्य भूमिकेतील मेघराज मल्लीनाथ यांच्यासोबत शुभम पवार, अनिल खोपकर, कमलेश अहिरे, तेजस गांगुर्डे, पूजा डोळस, संभाजी जगताप आदी कलाकार आहेत.

## सूरजचा 'बिग बॉस मराठी'च्या घरात गोलिगतचा धिंगाणा!

मराठी मनोरंजनाचा बॉस अर्थात 'बिग बॉस मराठी'चा नवा सिझन नुकताच प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. यंदाचा पाचवा सिझन हा प्रेक्षकांसाठी खास ठरत आहे. कारण सहभागी झालेल्या स्पर्धकांमध्ये कलाकारांसोबतच काही सोशल मीडिया इन्फ्लूएंसर देखील सहभागी झाले आहेत. त्यातीलच एक चर्चेत असणारं नाव म्हणजे गोलीगत सूरज चव्हाण. सोशल मीडियाच्या माध्यमातून चर्चेत असणारा सूरज चव्हाणने प्रेक्षकांना विशेष स्टाईलने आपलेसे केले आहे. पण आता मात्र त्याचे घरातील स्पर्धक जान्हवी किल्लेकरसोबत



चांगलेच वाजले आहे.

सूरजला अंकिता गार्डन एरियामध्ये घेऊन येते आणि तेथे बसवते. तेथे डीपी दादा, पांडूरंग आणि घरातील इतर स्पर्धक बसलेले दिसतात. तेव्हा डीपी दादा सूरजचा किस्सा सांगतात. तेव्हा ते सूरजला विचारतात तू मुद्दाम तर केले नाही ना. तेव्हा सूरज हो मी मुद्दाम केले असे बोलतो. त्यावर पॅडी म्हणजेच पांडूरंग बरोबर केलस तू. मला वाटलच होतं हे असंच असेल म्हणून मी मध्येही नाही आले असे बोलताना दिसातात. यापूर्वी देखील सूरजने इतरांची कामे करण्यास नकार दिला होता. तो त्याचे काम करतो आणि बाजूला सरकतो. पण जान्हवी किल्लेकर उगाचच घरात भांडत असल्याचे पाहायला मिळत आहे.

### ‘हम आपके है कौन’ चित्रपटाला ३० वर्ष पूर्ण, अनुपम खेरने सेटवरील आठवणी केल्या शेअर!

‘हम आपके है कौन’ हा चित्रपट १९९४ मधील सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट होता. या चित्रपटात दोन कुटुंबांमधील नातेसंबंध आणि त्यांच्या प्रियजनांसाठी त्यागाची कहाणी सुंदरपणे मांडण्यात आली आहे. राजश्री प्रॉडक्शनच्या बॅनरखालील ‘हम आपके है कौन’मध्ये सलमान खान आणि माधुरी दीक्षित मुख्य भूमिकेत दिसले होते.

‘नदिया के पार’ या चित्रपटाच्या कथेवर आधारित, ‘हम आपके है कौन’ या चित्रपटाचे दिग्दर्शन सूरज बडजात्या यांनी केले होते. चित्रपटातील गाणी, दृश्ये आणि संवाद प्रचंड प्रेक्षकांना आवडले होते. प्रेम (सलमान खान) आणि निशा (माधुरी दीक्षित) यांच्या जोडीने प्रेक्षकांची मने जिंकली होती. ५ ऑगस्ट रोजी या चित्रपटाने रिलीज होऊन ३० वर्षे पूर्ण केली आहेत. माधुरी दीक्षितच्या वडिलांची भूमिका करणारे अभिनेता अनुपम खेर यांनी यावेळी या चित्रपटाच्या आठवणी सोशल मीडियावर शेअर करून व्यक्त होताना दिसले आहेत.अनुपम खेर यांनी ‘हम आपके है कौन’ या चित्रपटाच्या सेटवरील सुंदर क्षणांनी साजलेले गोड व्हिडिओ शेअर केले आहेत. व्हिडिओची सुरुवात चित्रपटाच्या पोस्टरपासून होताना या व्हिडीओमध्ये दिसत आहे. एका फोटोमध्ये अनुपम सलमान आणि माधुरीसह संपूर्ण स्टारकास्टसोबत सेटवर नाचताना दिसत आहेत. चित्रपटातील कलाकार एका फोटोत हसताना दिसत आहेत. छायाचित्रांवरून बनलेला हा व्हिडीओ चाहत्यांना चांगलाच आवडला आहे. ही पोस्ट पाहून चाहत्यांच्या लगेचच प्रतिसाद मिळताना दिसत आहे.

## 'सातव्या मुलीची सातवी मुलगी' मालिकेतून ऐश्वर्या नारकरांची मालिकेतून एक्झिट?

झी मराठी वाहिनीवर 'सातव्या मुलीची सातवी मुलगी' ही मालिका चांगलीच प्रसिद्ध आहे. मागील काही दिवसांपासून मालिकेत नवे ट्विस्ट येत आहेत. नेत्राच्या नेत्रा व राजाध्यक्ष कुटुंबाला त्रिनयना देवीचा आशीर्वाद कळतो तो म्हणजे नेत्रा पाच नाही तर सात महिन्यांची गरोदर आहे. नेत्राला जुळी मुलं होणार असल्याची बातमी कळून सगळ्यांच्याच आनंदाला पारावार उरलेला नाही. राजाध्यक्ष कुटुंब विरोचकाला या जुळ्या मुलांची कुठल्याच प्रकारे माहिती न देण्याचं ठरवतात.

देवीनेच विरोचकाचा वध रचला आहे या विचाराने जल्लोषात नेत्राचं डोहाळेजेवण साजरं होतं आणि नेत्राला प्रसूतीकळा सुरू होतात. रुपालीही त्याचसाठी सज्ज झालेली असताना अद्वैत नेत्राला रुपालीच्या तावडीतून वाचवत हॉस्पिटलला घेऊन जायला निघतो. इंद्राणी व राजाध्यक्ष कुटुंब रुपालीला घरात थोपवून धरतात. अद्वैत नेत्राला हॉस्पिटलला घेऊन चाललेला असतानाच गाडी



### विरोचकाचा वध होणार

बिघडते. उपाय म्हणून अद्वैत हातगाडीवरून नेत्राला घेऊन जात असताना त्या हातगाडीचं चाक निखळतं आणि तेव्हाच नेत्राचा जीव वाचवायला एक हात येऊन ती हातगाडी धरतं आणि दिसतं की नेत्राला घेऊन जाणारी... अद्वैत च्या मदतीला धावून आलेली डॉक्टरचा वेश धारण केलेली त्रिनयना देवी आहे... ती त्रिनयना देवीच्या मंदिरालाच हॉस्पिटल म्हणून सांगत नेत्राला मंदिरात घेऊन जाते.

त्रिनयना देवीच्या मंदिरात एक दिव्य प्रकाशझोत पसरतो आणि नेत्रा जुळ्या बाळांची आई होते. देवी तिच्या मूर्त रूपात दर्शन देत नेत्राच्या हाती कट्यार देते. तिची पूर्वसूचना मिळण्याची जी ताकद आहे ती विरोचक वधासोबतच नष्ट होईल असं सांगते. नेत्रा विरोचकाचा वध करते. वध होताच त्रिनयना देवीवर रक्ताचा अभिषेक होतो परंतु त्या रक्ताचाच एक थेंब प्रवाही दिसतो. आता या मागील नेमकं रहस्य काय? कोणत्या नव्या संकटाची चाहुल आहे का, हे आता येणाऱ्या भागात दिसेल.

या मालिकेत ऐश्वर्या नारकर या विरोचक आहेत. ऐश्वर्या यांनी खलनायिका भूमिका मोठ्या ताकदीने साकारली आहे. आता, मालिकेत नेत्राकडून विरोचकाचा वध होणार आहे. त्यामुळे ऐश्वर्या नारकर यांची मालिकेतून एक्झिट होणार का, याची चर्चा सुरू झाली आहे. मालिकेतील एका एपिसोडमध्ये विरोचक आहे, असे सांगण्यात आले. त्यामुळे खरंच विरोचकाचा मृत्यू होणार की आणकी कोणत्या नव्या रुपात विरोचक येणार, याकडे ही प्रेक्षकांचे लक्ष लागले आहे.


प्रातःकाल मल्टीमीडीया लिमिटेडसाठी मुद्रक आणि प्रकाशक महीप गोयल यांनी हे दैनिक दांगट मीडिया प्रायवेट लिमिटेड, २२, दीघे एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, दीघे, नवी मुंबई - ४००७०८ येथे छापून ५४३, लक्ष्मी प्लाजा, लक्ष्मी इंडस्ट्रियल इस्टेट, न्यू लिंक रोड, अंधेरी (प.) मुंबई- ४०००५३ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महीप गोयल. आरएनआयक्रमांक- MAHMAR/२०१४/५७२६० दूरध्वनी- २६३१९९२६ ई मेल- pratahkalmarathi@gmail.com


# Mumbai

## SC agrees to hear plea challenging Bombay HC verdict upholding Hijab ban in a Mumbai college

Agencies

Mumbai, August 6





The Supreme Court on Tuesday agreed to hear a plea filed by a group of college students challenging the Bombay High Court's judgment which upheld the ban imposed on a private college in Mumbai on the wearing of hijab, nakab, burkha, cap, etc by students on its campus. A bench of Chief Justice of India D Y Chandrachud and Justices J B Pardiwala and Manoj Misra told the petitioners that the matter would be taken up soon as the case has been assigned to a bench. "I have already assigned a bench to hear the matter and that it would be listed soon in the coming days," the CJI told the counsel for the petitioners. The counsel asked the apex court to list the matter due to urgency. "The unit tests will take place soon, please list it," the counsel submitted. The authorities of the N G Acharya & D K Marathe College, in Mumbai prescribed a dress code prohibiting their students from wearing hijab, nakab, burkha, stole, cap, etc, on campus. Nine female students challenged this dress code before the Bombay High Court. A bench of Justices A S Chandurkar Rajesh S Patil had on June 26 refused to entertain the plea. The HC had said that the insistence for following the dress code is within the college premises, and the petitioners' freedom of choice and expression is not otherwise affected. Thereafter, the students moved the top court by filing an appeal before it by challenging the HC's order. The petitioners contended that the dress code and the restriction on hijab, nakab, burka etc in campus violates their fundamental rights. As per the code, the dress of the students is expected to be formal and decent, and should not reveal the religion of any student. Students contended that the dress code was arbitrary and discriminatory, and the college was wrong in its order in trying to impose the same. They stated, "The code infringes upon their right to choose their attire, their right to privacy, and freedom of expression under Article 19(1) (a) and their right to freedom of religion under Article 25 of the Constitution."

## Sushant Singh Rajput death case: Congress urges CBI to present facts

Agencies

Mumbai, August 6

Four years after the Central Bureau of Investigation (CBI) took over the case involving the death of actor Sushant Singh Rajput, the Congress has questioned the status and urged the central agency to present facts related to the case. Sushant (34) who was born on January 21, 1986, who had acted in Bollywood films such as M S Dhoni: The Untold Story (2016), Kedarnath (2018) and Chhichhore (2019), was found dead on June 14, 2020, at his rented duplex flat in Mont Blanc building at Bandra in Mumbai where he was found hanging from a ceiling fan. The CBI took over the case on August 5, 2000. Popularly known as SSR, Rajput's family has been seeking answers from the government and CBI.




Sushant was survived by his father Krishna Kishore Singh and four sisters - Nitu Singh aka Rani, Meetu Singh, Priyanka Singh and Shweta Singh Kirti. "Four years have passed. Why is the CBI silent," Maharashtra Pradesh Congress Committee general secretary Sachin Sawant wanted to know. According to Sawant, the BJP has exploited the case politically. In fact, the case snowballed into a major political issue involving the then Uddhav Thackeray-led Maha Vikas Aghadi (MVA) government. On the intervening night of June 8 and 9, 2020, Disha Salian (28), a talent manager who had once worked with Rajput, had reportedly died by suicide by jumping from the 14th floor of Galaxy Regent building at Malad in the far western suburbs of Mumbai. "It has been 1,460 days since Rajput's suicide, but the question of when the CBI will open its mouth remains unanswered," said Sawant in what a question for the BJP-led NDA dispensation at the Centre and the Maha Yuti government in Maharashtra is. The then Union MSME Minister Narayan Rane, who is now the BJP MP from Ratnagiri-Sindhudurg, and his son Nitesh Rane had been claiming that both the incidents are linked, and that Disha was raped before she was murdered and when Rajput came to know about this and was to expose those responsible, he too was killed. Sawant went on to add that despite the Mumbai Police and AIIMS' reports, the BJP politicised the issue for its nefarious purposes in Bihar. "Three investigative systems were used, many were tortured during the probe, yet the CBI has not revealed the final outcome," Sawant said. The Congress leader pointed out that even the Supreme Court was satisfied with the Mumbai Police investigation, but it was the BJP's political ploy to tarnish the MVA government and sully the city police's image with the help of the former Bihar Director General of Police Gupteshwar Pandey. Sawant also said that the BJP IT cell created thousands of fake Twitter, Facebook and YouTube accounts for propaganda.

## 'Should Study Law, Uphold Babasaheb's Legacy': Sanjay Raut On Prakash Ambedkar

Agencies

Mumbai, August 6

Shiv Sena (UBT) MP Sanjay Raut on Tuesday addressed a press conference in New Delhi. The presser came on the day his party chief Uddhav Thackeray is traveling to the national capital. Raut touched several issues in his interaction with media.

In response to Vanchit Bahujan Aghadi leader Prakash Ambedkar's statement that the true Shiv Sena party belongs to Eknath Shinde, Raut has hit back at him saying he should uphold BR Ambedkar's legacy. Raut remarked, "Prakash Ambedkar is the heir of Dr. Babasaheb Ambedkar and should uphold that legacy. If he believes that the Shiv Sena belongs to Eknath Shinde, he should study the law. Ramdas Athawale also has a party. Some parties emerge suddenly, and later, different people lead them."



## 17 Staff of Central Railway receive GM's Safety Award for the month of August-2024

By A Staff Reporter

Mumbai, August 6



Shri Ram Karan Yadav, General Manager, Central Railway, felicitated 17 Central Railway staff i.e. 9 from Mumbai Division, 4 from Bhusaval Division, 2 from Nagpur Division and 1 each from Pune and Solapur Divisions with Safety Award in a function held at Chhatrapati Shivaji Maharaj Terminus Mumbai on 06.08.2024. The awards were given in appreciation of their alertness during duty, their contribution in averting untoward incidents and ensuring safety in train operations during the previous months. The award consists of a medal, commendation certificate, a citation of exemplary safety work and cash of ₹ 2000/-.

1 & 2 Shri Yogesh Uttam Mali and Shri Lalit Vilas Patil, both Track Maintainers, Vasind/Mumbai division

3 & 4. Shri Santosh Kumar Sahni and Shri Shrikant Janardan Pagare, both Trackman, Lonavala/Mumbai division

5. Shri Tejbir Malaan, Track Maintainer, Lonavala/Mumbai division

6. Shri M. S Shelke, Motorman, Kalyan/Mumbai division

7. Shri Jagdish Bithoba Fitter / C & W Igatpuri / Mumbai division

8. Shri Piyush Kumar Chaurasia, Deputy Station Manager, Taloja/ Mumbai division

9. Shri Nitin Jadhav, Electrical Signal Maintainer, Mulund/Mumbai

10. Smt. Shalini Manoj, Technician, C&W Bhusaval, Bhusaval division

11. Shri Santosh Jadhav, Master Craftsman, C&W Chalisgaon / Bhusaval division

12. Shri Vikas Kumar, Keyman, Ankai/Bhusaval division

13. Shri Arvind, Constable, Shegaon/Bhusaval division

14. Shri Litesh Kumar Deshmukh, Assistant Loco Pilot Nagpur/Nagpur division

15. Shri Pramod Sahebrao, Keyman, Dhamangaon/Nagpur division

16. Shri Anil Kumar Helper, Signal &Telecommunications, Uruli/Pune division

17. Shri Suresh Lokhande SSE/ TRD Salgare/Solapur division

The General Manager in his address congratulated the awardees and complimented them for their alertness and dedication towards their duties. He said that such acts of alertness will motivate others to sincerely work towards the safety of passengers.

Shri Prabhat Ranjan, Additional General Manager, Shri M S Uppal, Principal Chief Safety Officer, Shri Rajneesh Mathur, Principal Chief Engineer, Shri S S Gupta, Principal Chief Operations Manager, Shri Sunil Kumar Principal Chief Mechanical Engineer, Shri Dharamveer Meena, Principal Chief Signal & Telecom Engineer, Shri S N Chaudhary, Principal Chief Security Commissioner and Shri N P Singh, Principal Chief Electrical Engineer and other Senior Officers of Central Railway were present on the occasion.

## Mumbai Central's Divisional Office Canteen Gets 'Eat Right Campus' Certificate

By A Staff Reporter

Mumbai, August 6

Recently, the Divisional Office Canteen of Mumbai Central Division of Western Railway received the prestigious 'Eat Right Campus' certificate by the Food Safety and Standards Authority of India (FSSAI). This certificate has been awarded to the Divisional Office Canteen by FSSAI. According to a press release issued by Shri Vineet Abhishek, Chief Public Relations Officer of Western Railway, Eat Right is a campaign of the Government of India which ensures safe and healthy food to the people. Different parameters are considered like cleanliness and hygiene of the premises and canteen, not using single-use plastic, not using paper for food items, ingredients used in cooking like spices, salt etc. should be branded, expiry date should be written on all food items, use of hand gloves by vendors and their police verification, facility of pure drinking water, availability of dustbins in adequate number for dry and wet waste etc.




# National News

## 'Cannot be a coincidence': 14 deaths in a month at Asha Kiran shelter home strange, says Delhi HC

**NEW DELHI:** Delhi High Court on Monday called the deaths of 14 inmates of a govt-run Asha Kiran shelter home in a month "strange" and sought a detailed report on it from the social welfare department and Delhi Jal Board.

"Just too many deaths in a short span of time. Fourteen deaths in just one month is a large number. It cannot be a coincidence. It is strange," the bench said about the shelter home for the mentally challenged. The bench of Justice Tushar Rao Gedela noted that nearly all the deceased suffered from tuberculosis.The court directed Delhi govt's secretary for social welfare, under whose department Asha Kiran operates, to visit and inspect the conditions of the facility in Rohini on Aug 6 and file a report, stressing the need for immediate "curative measures".



It questioned how tuberculosis was "rampant" in a shelter home, as could be seen from the cause of deaths. The court also directed Delhi Jal Board to test the quality of water as well as the condition of water and sewer pipelines. The DJB and the social welfare department secretary were asked to file reports. The court was responding to a PIL seeking its intervention.During the hearing, the govt's standing counsel Sameer Vashisht told the bench that out of the 14 deceased, one was a minor, and the "maximum" deaths happened in the hospital where they were being treated. He submitted that all the dead inmates unfortunately suffered from "severe and profound category of intellectual disability", had comorbidities, and were found in "precarious conditions" before they were brought to the shelter home. There is a team of doctors and nurses in the shelter home and the exact details with respect to the deaths would be known after post-mortem reports are received, he added.

## Supreme Court upholds LG's right to appoint MCD aldermen: Who are aldermen?

**NEW DELHI:** The Supreme Court of India has upheld the Delhi lieutenant governor's (LG) authority to appoint Municipal Corporation of Delhi (MCD) aldermen, leading to varied reactions from the Aam Aadmi Party (AAP) and the Bharatiya Janata Party (BJP). The verdict, delivered nearly 15 months after the Delhi government filed its plea, favors the BJP in the 18-member standing committee. AAP expressed strong disagreement, calling it a hit on democracy, while the BJP defended the established practice.

In its ruling, a bench comprising Chief Justice of India (CJI) D Y Chandrachud and Justices P S Narasimha and J B Pardiwala dismissed the Delhi government's argument that the LG should act on the advice of the council of ministers when nominating 10 aldermen to the MCD. This decision has major implications for the composition of the MCD standing committee, the highest decision-making body in the municipal corporation.Following the December 2022 MCD elections, in which AAP ended the BJP's 15-year rule by winning 134 seats compared to BJP's 104 and Congress's nine, the MCD standing committee's formation has faced delays due to court proceedings.



In 2023, the MCD House voted to allocate three standing committee seats each to AAP and BJP. There was contestation over the fourth member, representing the BJP, and the subsequent appointment of aldermen led to disruptions in the House as opposition councillors clashed.

With the Supreme Court's ruling, the MCD will now conduct fresh elections to elect the crucial fourth member of the standing committee. Whether the previous 3-3 result holds will depend on the new elections.

If the ten nominated aldermen support BJP councillors in the zonal elections, the BJP may very well be able to turn the tide in its favour.Congress, which has only nine councillors, can play a crucial role in electing members of the committee at zonal level where ten aldermen can vote.

## Elderly found dead in Maharashtra's Thane, police launch probe

Agencies

Mumbai, August 6

A 60-year-old man, who was apparently suffering from mental health issues, was found dead in an apartment in Maharashtra's Thane city shortly after midnight on Tuesday, officials said. The time and cause of the death were not yet known and police were conducting a probe into the case, Thane Municipal Corporation's disaster management cell chief Yasin Tadvi said. At 12.26 am, the local fire station received an alert about the body being spotted in a flat in Hans Nagar locality near Siddeshwar Talao, he said. Local fire personnel and regional disaster management cell team members rushed to the spot and found the decomposed body lying in the flat which was already opened by some neighbours. The neighbours experienced a foul smell emanating from the flat following which they broke open the apartment, the official said. Following an enquiry with the neighbours, the deceased was identified, he said, adding the man was a mental health patient. The Naupada police also arrived at the spot within minutes. They sent the body to a government hospital for postmortem and registered a case of accidental death, the official said.



### PUBLIC NOTICE

Notice is here by given that by virtue of Sale Deed dated 27/06/2024 registered under serial no. Wada-1266-2024, Mr. Hiraram Choudhary had purchased the Gala No. 4, on the Ground Floor, admeasuring 520 sq. ft. (built-up area), in the building known as "Cristal Apartment" A Wing, constructed on land bearing Gat No. 196, Hissa No. 1 (P), having admeasuring 2000 sq. mtr., situated at Village - Kudus, Taluka - Wada, District - Palghar from Rohidas Lodu Patil. Whereas, The Original First Chain Agreement dated 24/09/2009 registered under serial no. Wada-1546-2009 executed between M/s. Diamond Construction (Developer) and Kisan Sitaram Thakur (Purchaser) have been misplaced / lost and the same is registered with Police Station. Any person having any valid claim of right, title and or interest in the said Flat, should intimate the same in writing to me at my following address: G-2, Tania Rose C.H.S. Ltd., Tania Towen, Raj Nagar, Achole, Nalasopara (E), Tal. Vasai, Dist. Palghar - 401 209, along with documentary proof within 7 days from the date of publication of this notice, if no claims/objections are received within the period prescribed, I shall issue No Claim Certificate as requested by my client, and no claims shall be entertained thereafter.

Date: 07/08/2024

Sd/-

**Adv. Satish Pandey**

ADVOCATE HIGH COURT

**CFM ASSET RECONSTRUCTION PRIVATE LIMITED**

**REGISTERED OFFICE:** "Block no. A/1003, West Gate, Near YMCA Club, Sur No. 835/1+3, S. G. Highway, Makarba, Ahmedabad-380051 Gujarat"

**CORPORATE OFFICE:** 1ST FLOOR, WAKEFIELD HOUSE, SPROTT ROAD, BALLARD ESTATE, MUMBAI-400038 **EMAIL**: tejas.joshi@cfmarac.in,

**CONTACT:** 022-40055282/89768 62751 **CIN - U67100GJ2015PTC083994**

CFM thoughtful regeneration

**APPENDIX- IV-A**

**SALE OF MORTGAGE PROPERTIES/SECURED ASSETS BY WAY OF PRIVATE TREATY AS PER PROVISIONS /RULE MADE UNDER THE SARFAESI ACT'2002**

Sale Notice for sale of immovable assets under the Securitisation and Reconstruction of Financial Assets and Enforcement of Security Interest Act, 2002 read with proviso to rule 8(6) of the Security Interest Enforcement Rules, 2002.

Notice is hereby given to the public in general and in particular to the Borrower and Guarantors/Mortgagors that the below described immovable properties mortgaged/charged to the secured Creditor, the Physical Possession of which has been taken by the Authorized Officer of **CFM Asset Reconstruction Pvt Ltd** (Acting in its capacity as a Trustee of CFMARC Trust -5 IndusInd) on 07.10.2023. The undersigned is enforcing its security interest against the Secured Asset as described hereinabove by way of sale through private treaty under the provisions of SARFAESI Act, 2002 and rules framed thereunder. The Authorized Officer of the secured creditor has received an expression of interest (EoI) from a prospective purchaser towards purchase of the said Secured Asset, will be sold through Private treaty, in accordance with the provisions of SARFAESI Act,2002 and the rules thereunder pursuant to the receipt of an offer for purchase of below mentioned Secured Asset at an aggregate amount of **₹.15,00,00,000/- (Rupees Fifteen Crore Only)** on "As is where is basis", "as is what is basis", whatever is there is basis" and "No recourse Basis "**on 23-08-2024**, for recovery of amounting to ₹.40,78,49,614.87 (Rupees Forty Crore Seventy-Eight Lakhs Forty-Nine Thousand Six Hundred Fourteen and paise Eighty-Seven Only) as on 31-12-2023 together with further interest, cost & expenses due and/or realization due to the secured creditor from Borrower & Mortgagor Fedder Manufacturing Pvt. Ltd. (Mortgagor) (Erstwhile Lloyd Manufacturing Pvt Ltd.) PSL Engineering Pvt. Ltd. (co-borrower), Rajul Estates Pvt. Ltd. (co-borrower), Bharat Raj Punj –being legal heir of Late B.R. Punj (Guarantor)

| | |
|---|---|
| **DESCRIPTION OF SECURED PROPERTY** | Commercial Office admeasuring about 5496 sq. ft (Carpet) bearing no. 386 on the 2nd Floor, Sane Guruji Premises Co-op Society along with all the fixtures, fittings thereon and the undivided interest in the land situate, being and lying at property no block no. 7, Second floor, 386. Veer Savarkar Road, Opp. Siddhi Vinayak Temple, Prabhadevi, Mumbai – 400 025 in the registration Mumbai and which is bounded as follows: - •On or towards North: Plot No. 1210, Saiani Colony; •On or towards West: Plot No. 1210, Shree Sai Siddhi Vinayak CHSL; •On or towards East: SV Savarkar Marg, veer Savarkar Marg; •On or towards South: Plot No. 1209, Raheja Impress |
| **SECURED DEBT** | ₹.40,78,49,614.87 (Rupees Forty Crore Seventy-Eight Lakhs Forty-Nine Thousand Six Hundred Fourteen and paise Eighty-Seven Only) as on 31-12-2023 together with further interest, cost & expenses due and/or realization |
| **RESERVE PRICE** | ₹. 15,00,00,000/- [Rupees Fifteen Crore Only] |
| **PLACE OF SALE** | CFM-ARC, 1st Floor, Wakefield House, Ballard Estate, Mumbai – 400 038 |
| **DATE and TIME** | 23-08-2024; FRIDAY 11:00 A.M. and onwards |
| **CONTACT:** | Mr. Tejas Joshi Email – tejas.joshi@cfmarc.in **CONTACT:** 022-40055280/ 89768 62751 |

**Encumbrances if any:**

1. The Society Maintenance Outstanding as on 03rd July,2023 is ₹. 35,18,240/- with further dues.
2. The original title deeds and share certificate of the secured property has been lost by the borrower

The notice for redemption of debt u/s.13(8) of the SARFAESI Act,2002 was issued on 16th July,2024 vide our letter no CFMARC/5-Indusind/176/2024-25. This further notice is being given to all of you in compliance of Rule 8, Sub Rule 6 of SARFAESI Rules Under the SARFAESI Act 2002, informing the Borrower and all the Guarantors/ Mortgagors about holding of sale of the aforementioned Secured Properties under private treaty, with the advice to redeem the asset. If so desired by them, by paying the outstanding dues as mentioned herein above along with further interest and other costs thereon due and payable prior to the scheduled auction. In case of default in payment, any or all of the Secured Properties shall at the discretion of the Authorized Officer/Secured Creditor be sold through private treaty modes as prescribed under Rule 8(5) of Security Interest (Enforcement) Rule, 2002.

**Date: 07-08-2024.**

**Place: Mumbai**

**Sd/-**

**Authorised Officer**

**CFM Asset Reconstruction Pvt. Ltd.**

**Acting as trustee of CFMARC Trust - 5 Indusind**

**PUBLIC NOTICE**

This is to inform the general public that Original Share certificate no B-64, Distinctive Nos. from 246 to 250 of Surash Trust a member of Ganga Bhavan Co-op. Housing Society Limited having address at Plot No. 1053-52-1-22, J P Road, Versova, Mumbai - 400 061 have been lost/misplaced. The member of the society has applied for duplicate shares. The Society hereby invites claims and objections from claimants/objector or objectors for issuance of duplicate Share Certificate within the period of 14 (fourteen) days from the publication of this notice, with copies of such documents and other proofs in support of his/her/ their claims/objections for issuance of duplicate Share Certificate to the Secretary of Ganga Bhavan Co-op. Housing Society Limited Housing Society Limited. If no claims/objections are received within the period prescribed above, the Society shall be free to issue duplicate Share Certificate in such manner as is provided under the bye-laws of the Society. The claims/objections, if any, received by the Society shall be dealt with in the manner provided under the bye-laws of the Society.

Sd/-
**Secretary/Chairman**
**Ganga Bhavan Co-op. Housing Society Limited.**

**Place :** Mumbai
**Date :** 13/08/2024



# SASHWAT TECHNOCRATS LIMITED

**(CIN: L24220MH1975PLC018682)**

**Regd. Office :** Office no. 14, First Floor, Plumber House, 557, JSS Road, Chira Bazar, Mumbai- 400002, **Tel No.** 22016021/22016031, **Email id:** sashwat.technocrats@gmail.com

**EXTRACT OF UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED 30TH JUNE, 2024**

(Rs.in Lakh)

| SR. NO. | PARTICULARS | Quarter Ended Unaudited 30-Jun-24 | Quarter Ended Audited 31-Mar-24 | Quarter Ended Unaudited 30-Jun-23 | Year Ended Audited 31-Mar-24 |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Total Income from Operation (Including other Income) | 1.88 | (6.42) | 4.01 | 19.46 |
| 2 | Net Profit for the Period (before Tax, Exceptional Items and / or Extraordinary Items) | (2.68) | (8.54) | (0.77) | 10.30 |
| 3 | Net Profit / (Loss) for the Period (before Tax but after Exceptional Items and / or Extraordinary Items) | (2.68) | (8.54) | (0.77) | 10.30 |
| 4 | Net Profit / ( Loss) for the period after tax | (2.68) | (8.54) | (0.77) | 10.30 |
| 5 | Total Comprehensive Income (Comprising Profit for the period (after tax) and other comprehensive Income (after tax) | (2.68) | (8.54) | (0.77) | 10.30 |
| 6 | Paid-up Equity Share Capital (Face Value Rs.10/-) | 30.62 | 30.62 | 30.62 | 30.62 |
| 7 | Earning per share (of Rs. 10/- each) (not annualised) | | | | |
| | a) Basic | (0.88) | (2.79) | (0.25) | 3.36 |
| | b) Diluted | (0.88) | (2.79) | (0.25) | 3.36 |

Notes :

1 The above Unaudited results were reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors in their meeting held on 12th August, 2024 subject to 'LimitedReview' by the Auditors of the company, in accordance with SEBI (Listing Obligations and Disclosure Requirement) Regulations, 2015.

2. The above is an extract of the detailed format of quarterly results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligation and Disclosure Requirments) Regulation, 2015. The full format of the quarterly financial results are available on the Stock Exchanges websites i.e. www.bseindia.com.and www.sashwattechnocrats.com

**For & on behalf of the Board of Directors**
**Sashwat Technocrats Limited**
**Sd/-**
**Manish Jakhalia**
**Director-Chairman**
**DIN: 01847156**

**Place: Mumbai**
**Date : 12/08/2024**



**IN THE BOMBAY CITY CIVIL COURT AT DINDOSHI**
**COMMERCIAL SUIT NO. 28 of 2019**

**BANK OF BARODA,** a body corporate constituted under the provisions of the Banking Companies (Acquisition & transfer of undertakings) Act, 1970 having its Head Office at Mandvi, Baroda,and one of its Branch office amongst others at Ground Floor Mulji Apartment, S.V. Road.Borivali (E), Mumbai - 400066 through, it's Chief Manager of the Branch
**Mr. K R Singh aged 41 Years** )... **Plaintiff**

**VERSUS**

